# प्रकरण तिसरे

# सोलापूर जिल्हयाचा समग्र आढावा

३.१ सोलापूर जिल्हयाची पार्श्वभूमी

३.२ सोलापूर जिल्हयाचे स्थावर क्षेत्रफळ

३.३ प्रशासकीय विभाग

३.४ भौगोलिक वैशिष्टे

३.५ अवर्षण प्रवण जिल्हा

३.६ धार्मिक ऐतिहासिक व पर्यटनस्थळे

३.७ लोकसंख्या

३.८ शेती

३.९ जमीन धरणा

३.१० जमिनीचा वापर

३.११ सोलापूर जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र

३.१२ कृषी उत्पादन साठवणूक

३.१३ सिंचनाच्या सोई सुविधा

३.१४ जिल्ह्यातील पशुधन

३.१५ वाहतुक व दळणवळण

३.१६ शिक्षण विषयक माहिती

३.१७ सार्वजनिक आरोग्य विषय सोयी व सेवा

३.१८ जिल्हा उत्पन्न

३.१९ उद्योग

३.२० पर्यटन

३.२१ फलोत्पादन

३.२२ मृदा

३.२३ जलसिंचन

३.२४ पर्जन्यमान

३.२५ जिल्हयातील उद्योगाबाबत तपशील

३.२६ भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्त्व

३.२६.१ संस्थात्मक स्त्रोत

३.२७.१.१ सहकारी बँका

३.२७.१.२ प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था

३.२७.१.३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

३.२७.१.४ राज्य सहकारी बँक

३.२७.१.४.१ राज्य सहकारी बँकेची उद्दिष्टे

३.२७.१.५ व्यापारी बँका

३.२७.१.६ अग्रणी बँक योजना

३.२७.१.७ विभागीय ग्रामीण बँका

३.२७.१.८ विभागीय ग्रामीण बँकांचे उद्देश

३.२७.१.९ विभागीय ग्रामीण बँकांची कार्ये

३.२८ सरकार मार्फत कर्ज

३.२८.१ भारतीय स्टेट बँक

३.२९ भारतीय रिझर्व्ह बँक

३.३० सन २०११-१२ मधील तालुकानिहा व्यापारी बँका

३.३१ नदी प्रणाली

३.३२ भूमी उपयोजन

३.३३ हवामान

३.३४ तापमान

३.३५ पाऊस

३.३६ लिंग गुणोत्तर

३.३७ मागासलेली जाती व जमाती यांचे प्रमाण

३.३८ कृषि व्यवसाय

३.३९ तालुका निहाय लोकसंख्या वाढ

३.४० ग्रामीण - नागरी लोकसंख्या वाढ

३.४१ पिक पध्दती

३.४२ उत्पादन प्रारूप

३.४३ सारांश

३.४४ संदर्भ साधने

# प्रकरण तिसरे

# सोलापूर जिल्हयाचा समग्र आढावा

## ३.१ सोलापूर जिल्हयाची पार्श्वभुमी

सिध्दरामेश्वरांच्या काळात सोलापूर शहरला सोन्नलगी या नावाने ओळखले जायचे. त्या नंतर ब्रिटीशांच्या काळात या शहरात सोळा पेठ असल्याने त्याला सोळापूर/शोलापूर या नावाने ओळखले जायचे. त्याचाच अप भ्रंश होऊन पुढे सोलापूर हे नाव झाले आहे. सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांना जोडणारा दुवा आहे. प्राचीन काळापासुन पश्चिम किनाऱ्याकडील जाणाऱ्या व्यापारी मार्ग सोलापूर जिल्हयातून जात होता. ब्रिटीश काळात मुंबईशी व्यापारी मार्गानी जोडलेला होता. सध्याच्या सोलापूर जिल्हा हा पुर्वी अहमदनगर, पुणे व सातारा या जिल्हयाचा भाग होता. सन १८३८ मध्ये सोलापूर हा अहमदनगर जिल्हयाचा उपजिल्हा बनला. १८६४ मध्ये हा जिल्हा बरखास्त करण्यात आला. १८६९ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा व सातारा जिल्हयातील पंढरपुर व सांगोला हे उपविभाग जोडुन सोलापूर जिल्हा तयार झाला. १८७५ मध्ये माळशिरसही त्यात जोडण्यात आला.

सन १९५६ साली राज्य पुर्नरचनेनंतर सोलापूर जिल्हा मुंबई प्रांतात समाविष्ट करण्यात आला व सन १९६० पासुन महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा बनला आहे. सोलापूरला एक ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. इ.स. पुर्व २०० वर्षापासुन सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, बहामनी, निजामशाही, आदिलशाही, मराठे, पेशवे व ब्रिटिश या सर्व राजवटी सोलापूर जिल्हयाने अनुभवल्या यादवांच्या काळात या भागाला सोन्नलगी म्हटले जात होते. मोगल राजवटीत यास संदलपूर असेही म्हटले जात होते. ब्रिटिश काळात सोलापूर हे नाव रुढ झाले असावे असा अंदाज व्यक्त केला जातो.

सोलापूरचा इतिहास रोमांचक आहे. मुंबई ते चेन्नई रेल्वे मार्गावरील महत्वाचे स्थानक असल्यामुळे स्वातंत्र्यपुर्व काळात राष्ट्रीय पातळीवरील सर्व राजकीय सामजिक घडामोडींचे पडसाद सोलापूरमध्ये उमटत असत. पहिल्या महायुध्दानंतर भारतात मोठा संप पुकारला. सोलापूरलाही जोनवारी १९२० मध्ये कामगारांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात संप पुकारला होता. सन १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सोलापूरकर हिरीरीने सहभागी झाले होते. या सत्याग्रहात दारुबंदीचा प्रचार करण्यासाठी काही तरुण कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला. या वेळी शंकर शिवदारे हा तरुण तिरंगा हातात घेऊन धावला व ब्रिटिशांच्या गोळीबरात बळी पडला हा शंकर शिवदारे सोलापूरचा पहिला हुतात्म्यामुळे सोलापूर पेटून उठले.

दि. ८ व ९ मे १९३० या दोन दिवसात तत्कालीन कलेक्टर नाईट याने जमावांवर अमानुष गोळीबार केला. अनेक नागरिक गोळीबारात बळी पडले. या अंदोलना दरम्यान दि. ९, १०, ११ मे, १९३० असे तीन दिवस सोलापूर ब्रिटिशांच्या अधिपत्य संपुष्टात आणून ब्रिटीश मुक्त झाले होते. भारतातील (काही काळासाठी) स्वतंत्र झालेला असा हा पहिला भाग.

मे- जुन १९३० मध्ये सुमारे ४९ दिवस मार्शल लॉ कायदा सोलापूरला लागू होता. या काळात सोलापूरच्या ४ निरापराध युवकांना फाशी देण्यात आले. अब्दुल कुर्बान हुसेन , मल्लप्पा धनशेटटी, श्रीकिसान सारडा व जगन्नाथ शिंदे हे सोलापूरचे युवक दि. १२ जानेवारी १९३१ रोजी धीरोदात्तपणे फासावर चढले. या प्रेरणादायी क्रांतिपर्वामुळेच सोलापूरला हुतात्म्याचे शहर म्हटले जाते. पुतळंयाच्या माध्यमातून आज या हुतात्म्यांची स्मृती सोलापूरात जतन करतण्या आली आहे. सन १९३०-३१ मधील या घटनांनचे संदर्भ तत्कालीन केसरी मध्ये आढळतात.

## ३.२ सोलापूर जिल्हयाचे स्थावर क्षेत्रफळ:-

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या अग्नेय दिशेत वसलेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७.१० अंश ते १८.३२ अक्षांश व ७४.४२ अंश ते ७६.१५ अंश पुर्व रेक्षांश यांच्या दरम्यान आहे. जिल्हयाच्या उत्तरेस अहमदनगर हा जिल्हा, पुर्वेस उस्मनाबाद हा जिल्हा, दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे हे जिल्हे आहे. जिल्हयाचे एकुण भौगोलिक क्षेत्रफळ १४८९५ चौ.कि.मी. असुन ते महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या ४.८४% इतके आहे. जिल्हयाच्या एकुण क्षेत्रफळापैकी १.१५% (१७०.७९ चौ.कि.मी.) क्षेत्र नागरी व ९८.१५% (१४७२४.२१ चाै.कि.मी.) क्षेत्र ग्रामीण आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने करमाळा (११.२७चौ.कि.मी.) तहसील सर्वात मोठा (१६०४.८० चौ.कि.मी.) असुन दक्षिण सोलापूर तहसील सर्वात लहान (०.९५% चौ.कि.मी.) आहे. जिल्हयातील बहुतांश जमीन ज्वालामुखीच्या उद्रेकातून तयार झाली असल्याने जमिनीचा खालचा थर मुरुमाड स्वरुपाचा आहे. तरी देखिल कांही प्रमाणात मातीचे स्वुरप स्थानानुसार बदललेले दिसते. यात सांगोला, मंगळवेढा तालुक्यातील कांही भागात तपकिरी रंगाची काळी जमिन आढळते, तसेच पंढरपूर आणि माढा तालुक्यातील हलकी प्रतिची जमीन आढळते. सांगोला तालुक्यातील जमीन उथवट निकृष्ट प्रकारची आहे.

# भारताचा नकाशा




नकाशा क्र १

सोलापूर पुणे जिल्हयांच्या सीमेवर माढा तालुक्यात उजनी येथे भीमा नदीवर धरण बांधण्यात आलेले आहे. या धरणामुळे सोलापूर शहरासह जिल्हयाच्या पश्चिम व मध्य भागांत पाणीपुरवठा सुलभतेने होतो. १९८० मध्ये बांधून

पुर्ण झालेलया उजनी धरणाच्या जलाशयाला यशवंतसागर असे म्हटले जाते. शेतीसाठी सिंचन, पिण्यसाठी पाणी, उद्योगांना पाणी, साखर कारखान्यांना पाणी, विद्युत निर्मिती असे अनेक उददेश साध्य करणारा हा बहुउद्देशीय प्रकल्प आहे. या धरणाच्या परिसरात फ्लेमिंगो (रोहित) पक्षी आढळतात. भीमा सीना जोडकालव्यामुळे जिल्ह्यातील सात तालुक्यांना लाभ होतो. भीमा सिना बोगदा हा आशिया खंडातील सर्वात मोठा बोगदा आहे. उजनी धरणातून या बोगद्याद्वारे सीना नदीत पाणी सोडले जाते. याचबरोबर जिल्ह्यात सहा मध्यम प्रकल्प आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यात एकरुखे (हिप्परगी) तलाव आहे याचाही फायदा असापासच्या भागांतील लोकांना होतो.

**महाराष्टचा नकाशा**




**नकाशा क्रमांक २**

## सोलापूर जिल्हा




**नकाशा क्रमांक ३**

### ३.३ प्रशासकीय विभाग

सोलापूर जिल्ह्यात करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, पंढरपुर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट हे तालुके समाविष्ट आहेत. जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय सोलापूर येथे असून जिल्ह्यात सोलापूर, माढा (कुर्डुवाडी) माळशिरस व पंढरपूर असे चार महसूल उपविभाग आहेत. १९८१ च्या जनगणनेनंतर बार्शी तालुक्यातील ८ गावे उस्मानाबाद जिल्ह्यात व सांगोला तालुक्यातील कांही गाव सांगली जिल्ह्यात हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. जिल्ह्यात ९ नगरपरिषदा व १ महानगरपालिका आहे.

### ३.४ भौगोलिक वैशिष्टे

जिल्ह्याचे मुख्यालय सोलापूर या ठिकाणी आहे. सोलापूर जिल्हा समुद्रसपाटीपासुन ५५० मी. उंचीवरआहे. जिल्ह्यामध्ये महत्वाचे पर्वत नाहीत. परंतु बालाघाट पर्वत श्रेणीचे कित्येक फाटे बार्शी तहसीलच्या उत्तरेस काही मैल पसरलेले आहेत. त्याच प्रमाणे करमाळा, माढा व माळशिरस तहसीलमध्ये विखुरलेले डोंगर आहेत. करमाळा तहसीलमध्ये वाघोबा व बोडी या डोंगारांची उंची अनुक्रमे २१० व १९० फुट आहे. माढा तहसीलच्या उत्तरेस असलेल्या चिंचगाव डोंगराची उंची ३०० फुट असुन तो ६ किमी पसरलेला आहे.

जिल्ह्यामध्ये भिमा ही प्रमुख नदी असुन तिच्या उजवी कडील भागात निरा व माण आणि डाव्या भागात सिना व भोगावती या उपनद्या आहेत. भिमा नदी ही सह्याद्री पर्वतावरील भिमाशंकर (तालुका कोड, जिल्हा पुणे) येथून उगम पावून अग्नेय कडे पुणे व अहमदनगर या जिल्ह्यातून वाहत येते. या नदीच्या पाणलोट क्षेत्रात डाव्या बाजुस करमाळा तालुक्याचा पश्चिमेकडील आणि माढा व पंढरपुर व दक्षिण सोलापूर हे तहसिल आणि उजव्या बाजुस पंढरपुर तहसिलाचा दक्षिण भाग व मंगळवेढा तहसिलचा समावेश आहे. भिमा नदीची जिल्ह्यातील एकूण लांबी २८९ कि.मी. आहे.

सन २०११ या वर्षात सोलापूरचे कमाल तापमान ४३.१ अंश सेल्सिअस व किमान तापमान १५.९ अंश सेल्सिअस नोंदलेवेले आहे. हवामानाच्या दृष्टीने संपूर्ण जिल्हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडतो. मान्सुनचा कालवधी जूनच्या पहिल्या पंधरवाड्यापासुन सप्टेंबर अखेर असतो. जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्यमापन ५६१.४७ (२०१०-११) मि.मि. आहे. कोष्टक ३.२ मध्ये तालुकानिहाय पर्जन्यमानाची सरासरी (२०१०-११) दर्शविली आहे. तर आकृती ३.२ मध्ये तालुकानिहाय पर्जन्यमानाची सरासरी स्तंभालेखामध्ये दर्शविली आहे. वरील आकृतीत तालुकानिहाय पर्जन्यमानाची सरासरी दाखवली आहे. सन २०१०-११ मध्ये जिल्ह्यात सरासरी ५६१.४७ मि.मि. इतका पाऊस झाला. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस अक्कलकोट तालुक्यात ६७६.३ मी.मी. इतका झाला, तर सर्वात कमी सांगोला तालुक्यात ४६२.६ मि.मि. झाला होता.

### ३.५ अवर्षण प्रवण जिल्हा

पारदासानी समितीने १९५७ पर्यंतच्या ३० वर्षाच्या कालावधीतील पर्जन्यमान जाहीर झालेली दुष्काळ / टंचाई स्थिती याचा अभ्यास करुन बार्शी पाटबंधारे लाभक्षेत्रातील माळशिरस तालुक्याचा भाग वगळता इतर सर्व तालुके अवर्षक प्रवण असल्याचे १९६० साली जाहीर केले. दुसऱ्या केंद्रीय जलसिंचन आयोगाने १९६२ साली देखील माळशिरस तालुका वगळता इतर सर्व तालुके अवर्षक प्रवण जाहीर केले होते.

त्यानंतर सुगथनकर समितीने १९७३ मध्ये जिल्हयातील लहरी व तुटपुंज्या पर्जन्यमानाचा सखोल अभ्यास करुन माळशिरस व पंढरपुरचा कालवा बागायत भाग वगळता संपूर्ण जिल्हा अवर्षक प्रवाण क्षेत्र म्हणून जाहीर केला. केंद्र शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने जिल्ह्यातील सर्व ११ तालुके आवर्षक प्रवाण असल्याचे मान्य केलेले आहे.

**३.६ धार्मिक ऐतिहासिक व पर्यटनस्थळे**

जिल्हयात वारकरी सांप्रदायाचे प्रमुख क्षेत्र पंढरपुर तिर्थक्षेत्र आहे. आषाढी, कार्तिकी आदी वाऱ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून व अन्य राज्यातून लाखो वारकरी श्री विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी पंढरपूर क्षेत्रास भेट देतात. सोलापूर जिल्ह्यात अनेक तिर्थक्षेत्र व ऐतिहासिक स्थळे आहेत. त्यात प्रामुख्याने सोलापूर शहरातील श्री. सिध्देश्र्वराचे मंदिर, अक्कलकोट तालुक्यातील श्री. स्वामी समर्थ महाराजांची समधी व हनुमान मंदिर, बार्शी तालुक्यातील भगवंताचे मंदिर तर सोलापर जिल्ह्याजवळ असलेल्या उस्मनाबाद जिल्ह्यामध्ये तुळजापूर तालुक्यातील श्री तुळजाभवानी मंदिर प्रसिध्द आहे.

मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील नागनाथ मंदिर, मंगळवेढ्यातील दामाजी पंत, चोखामेळा, कान्होपात्रा या संताच्या वास्तव्याने पुनित झालेला मंगळवेढा, माचकुर येथील सिध्देश्वराचे प्राचीन शिवमंदिर, करमाळा व माढा येथील देवीची मंदिरे, माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथिल प्राचीन अवशेष अर्धनारी नटेश्वर मंदिर व अन्य हेमाडपंथी मंदिरे ही या जिल्ह्याची उल्लेखनिय स्थाने आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज येथील माळढोक हे दुर्मिळ पक्ष्यांचे व हरणांचे अभयारण्य असुन ते एक पर्यटन स्थळ झालेले आहे. जिल्हयात अक्कलकोट तालुक्यामध्ये जुना राजवाडा आहे.

**३.७ लोकसंख्या**

जनगणना सन २०११ प्रमाणे सोलापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४३.१७ लाख होती. यापैकी २६.२४ लाख ग्रामीण लोकसंख्या असून नागरी लोकसंख्या १२.२५ लाख इतकी आहे. तर लोकसंख्या वाढीचा दर वार्षिक ०.१९१ असा असुन लोकसंख्येची घनता २९० द.चौ.कि.मी. आहे. जिल्ह्यातील दर हजार पुरुषामागे स्त्रियाचे प्रमाण ९३८ आहे. सरासरी साक्षरता ७७.०२ टक्के आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता ८५.०३ टक्के आहे. तर स्त्री साक्षरता ६८.५५ टक्के आहे.

सन २०११ च्या जगणनेप्रमाणे जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ५.७८ लाख व अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०.६९ लाख इतकी होती. कोष्टक क्रमांक ३.३ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील १९०१ ते २०११ दरम्यान लोकसंख्या वाढ दाखविली आहे. १९२१ च्या दशकात अपवाद वगळता जिल्ह्यातील लोकसंख्या सतत वाढत आहे हे दिसुन येते. सन २००१ च्या जनगणनेशी तुलना करता सन २०११ मध्ये १२.१६ टक्केनी वाढ झाली आहे.

**३.८ शेती**

सोलापूर हा जिल्हा कमी पावसाच्या पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो. येथे पावसाचे वार्षिक सरासरी प्रमाण ५०० ते ७५० मि.मी. (५० ते ७५ से.मी.) इतके आहे. तसेच पावसाची विभागणीदेखील काही ठिकाणी असमान आहे, तरी उजनी धरणामुळे येथील बागयत क्षेत्र १८ ते २० टक्के आहे. यावर प्रामुख्याने ऊस हे पीक घेतले जाते. एकूण ७५ ते ८२ टक्के शेती लहरी पावसावर अवलंबू आहे. सोलापूर जिल्ह्याला ज्वारीचे कोठार म्हटले जाते. रब्बी मोसमातल्या ज्वारी पिका खालील क्षेत्र सुमारे ७ लाख हेक्टर आहे. खरीप ज्वारी क्षेत्र सुमारे १५०० हेक्टर आहे. ज्वारीची मालदांडी ३५-१ ही जात प्रसिध्द आहे.

१९९० मध्ये आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या फळबाग रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमुळे सोलापूर जिल्ह्यात फळबाग क्षेत्रात क्रांती झाली. डाळींब (सुमारे ३० हजार हेक्टर), बोर (सुमारे २० हजार हेक्टर) या पिकांसह आंबा (९हजार हेक्टर) सिताफळ, आवळा, जांभूळ यांच्या फळबागा आढळतात, पण कमी पाऊस असूनही केवळ विशिष्ट हवामानामुळे जिल्हयात वाढ होत आहे. तसेच फळ प्रक्रिया उद्योगाबद्दलही आकर्षण वाढते आहे. द्रक्षांची लागवड जिल्ह्यात अधिकाधिक होत आहे. मोहोळ, पंढरपुर तालुक्यात द्राक्षापासुन बेदाणे ही तयार केले जातात. सांगोला व पंढरपूर तालुक्यांमध्ये डाळिंबाची लागवड मोठया प्रमाणावर केली जाते. सोलापूर जिल्हयात मुळेगाव येथे (१९३३ साली पुण्याहुन येथे आणण्यात आलेले) कोरडवाहू शेती संशोधन केंद्र आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये रब्बी ज्वारी संशोधन केंद्र व डाळिंब संशोधन केंद्रही आहे. सोलापूर जिल्ह्यातील कृषीतज्ञ व कृषिअधिकारी श्री. वि. ग. राऊळ यांनी प्रामुख्याने फळबाग क्षेत्रात केवळ सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात क्रांती घडवुन आणलेली आहे . डाळिंब, बोर तसेच सुर्यफुल, करडई या पिकांबाबत त्यांनी शेतकऱ्यांना मागदर्शन करुन त्यांना संघटीत केले.

### ३.९ जमीन धरणा

कृषी गणना सन २०१० नुसार सोलापूर जिल्ह्यातील वहिती खातेदारांची संख्या ६.६७ लाख असून त्याचे एकूण क्षेत्र १२.६० लाख हेक्टर आहे. कोष्टक क्र ३.४ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील सीमांत, लहान, मध्यम आणि मोठे वहिती खातेदारांकडील जमीन धारणा दर्शवली आहे. सन २०००-०१ शी तुलना करता २०१०-११ मध्ये जिल्ह्यातील सीमांत व लहान जमीन धारणा असलेल्या खातेदारांची संख्या अनुक्रमे ३२.१३ % वरुन ३५.४६% पर्यंत वाढली आहे. त्याचवेळी लहान जमीन खातेदारांची संख्या ३१.०१% वरुन ३१.८७% पर्यंत वाढली आहे. म्हणजे जिल्ह्यातील जमिनीचे सीमांती सुरु असलेले दिसते.

### ३.१० जमिनीचा वापर

सन २०००-०१ च्या अकडेवारीनुसार जिल्हयाच्या एकूण भोगोलिक क्षेत्रापैकी २.१४ % क्षेत्र हे जंगल व्याप्त आहे. ८.१५% शेतीला उपलब्ध नसलेले, २२.१६% लागवड न केलेले व पडिक, तर निव्वळ असलेले क्षेत्र ६५.६२% इतके होते.

### ३.११ सोलापूर जिल्ह्यातील पिकाखालील क्षेत्र

जिल्ह्यात सन २००२-०३ मध्ये प्रामुख्याने एकुण पिकाखालील क्षेत्रापैकी तृनधान्यखाली ७३.८८% क्षेत्र होते. ऊस या नगदी पिकाखाली १९% क्षेत्र होते. गळीताच्या पिकखाली २३% क्षेत्र असुन, जिल्ह्यात सन २००९-१० या वर्षी ३९६ हजार मे.टन रासायनिक खतांचे वाटप करण्यात आले असून, सन २००८-०९ च्या तुलनेत रासायनिक खतांचे वाटप २९.४७ % यांनी अधिक प्रमाणात झाले आहे. सन २००२-०३ च्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात लागवडीखालील एकूण क्षेत्रांपैकी २५.७५% क्षेत्र ओलीताखाली असून निव्वळ ओलीताखालील क्षेत्रापैकी १००% क्षेत्र पृष्ठभागीय उपसा सिंचनाद्वारे आहे. ओलिताखालील क्षेत्रापैकी ४६.०९% क्षेत्र अन्नधान्यखाली, तर २६.७१% ऊसाखालील तर उर्वरित क्षेत्र इतर पिकांखालील आहे.

### ३.१२ कृषी उत्पादन साठवणूक

जिल्ह्यातील सर्व ५० पणनसंस्थेस २०१०-११ या वर्षात एकूण १.९२ लाख रुपये किंमतीच्या मालाची खरेदी झाली आणि रुपये १.९८ लाख किंमतीची मालाची एकुण विक्री झाली, यात माल म्हणून १.८७ लाख व आडत्या म्हणून ०.१० लाख इतक्या रकमेची विक्री करण्यात आली. जिल्ह्यात ३१/०३/२०११ रोजी एकूण ४३ शासकीय गोदामे

होती. या गोदामाची क्षमता सुमारे ३२ हजार मे.टन होती. उत्पादनाच्या साठवणूकीसाठी सहकारी संस्थाच्या मालकीची व भाड्याने घेतलेली गोदामेही आहेत.

**३.१३ सिंचनाच्या सोयी**

सन २००९-१० पासून जिल्ह्यात भीमा व वीर धरण हे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यात ७ मध्यम पाटबंधारे, ३८ लघु सिंचन प्रकल्प, १०९० पाझर तलाव व ७२९ कोल्हापूर पध्दतीचे बंधरे पुर्ण झाले आहेत.

**३.१४ जिल्ह्यातील पशुधन**

१८ व्या पशुधन गणनेनुसार जिल्ह्यातील एकूण गुरे १९,९२,१२६ आहेत त्यापैकी एकूण विदेशी व मिश्रजातीय गुरांची संख्या ३,१५,०१३ होती, तर एकूण स्वदेशी गुरे ८,७७,११३ इतकी आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील एकूण म्हशींची संख्या ४,५८,४४६ इतकी आहे. तर यापैकी पैदास म्हशी ४,१०८ आहेत.

**३.१५ वाहतुक व दळणवळण**

सोलापूर रेल्वे वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचे केंद्र आहे. कुर्डुवाडी व होटगी हे जंक्शन्स जिल्ह्यात आहेत. मुंबई-चेन्नई, सोलापूर, विजापूर व मिरज, लातुर हे तीन लोहमार्ग जिल्ह्यातून गेले आहेत. कन्याकुमरी, चेन्नई, आग्रा, दिल्ली, हरिद्वार, भुवनेश्वर बेंगलोर, हैद्रबाद ही अनेक शहरे रेल्वेद्वारे सोलापूर जिल्ह्याशी जोडली गेली आहेत. हे रेल्वेच्या दृष्टीकोणातून पाहिल्यास दक्षिणेचे प्रवेशद्वारे आहे. जिल्ह्यातून पुणे हैद्रबाद राष्ट्रीय महामार्ग क्र ९ हा जातो. तसेच सोलापूर विजापूर मंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्र १३ हाही जातो. सोलापूर औरंगाबाद धुळे हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ जातो.

रत्नागिरी नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २०४ ही सोलापूर जिल्ह्यातून जातो. संदर्भ वर्ष २०१०-११ नुसार रस्त्याची एकूण लांबी १४८५३.३८ कि.मी. होती. रेल्वेमार्ग जिल्हयात आहे. राष्ट्रीय महामार्गाची लांबी १७७ कि.मी., राज्य महामार्गाची लांबी १५७२ कि.मी., प्रमुख जिल्हा मार्ग ३०११ कि.मी., इतर जिल्हा मार्ग ४०४०.६८ व ग्रामीण मार्ग ६०५३ कि.मी. आहे. रेल्वे मार्गाची लांबी ३७५ कि.मी. इतकी आहे. जिल्ह्यात एकूण मालवाहुक वाहने २७०६६ इतकी आहेत. तसेच प्रवासी वाहने २८७९६३ आहेत. जिल्हयातील डाक कार्यालयाची संख्या ५२८ इतकी आहे. सोलापूर जिल्ह्यातील चादर देशात प्रसिध्द आहे. तसेच चादर व्यापर व साखर, अन्नधान्यांचा व्यापार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर चालतो.

### ३.१६ शिक्षण विषयक माहिती

सोलापूर जिल्ह्यात एका जिल्ह्यासाठी स्वतंत्र असे सोलापूर विद्यापीठ आहे. या विद्यापीठाशी सलंग्नित १२२ महाविद्यालये सुरु आहेत. या सर्व महाविद्यालयातून ५५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच शिक्षण विभागाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सन २०११ अखेर जिल्ह्यात ४०८१ प्राथमिक शाळा, ६०४ माध्यमिक शाळा, १०९ उच्च माध्यिमिक शाळा व १९ सामान्य शिक्षणाची विद्यालये आहेत. या व्यतिरिक्त २० शिक्षण विषय पदवी महाविद्यालये आहेत. ४ विधी महाविद्यालये आणि प्रत्येकी एक या प्रमाणे वैद्यकीय व आयुर्वेदिक महाविद्यालये, १० अभियांत्रीकी महाविद्यालये आहेत.

५ तंत्रनिकेतन, १२ आय.टी.आय., व २५ डी.एड., या प्रमाणे अन्य संस्था कार्यरत आहेत. वरील संदर्भीय वर्षात एकुण ८.९७ लाख विद्यार्थ्यापैकी ५६.८६% विद्यार्थी प्राथमिक शाळेत, २६.९० % विद्यार्थी माध्यमिक शाळेत, १४.६०% विद्यार्थी उच्च माध्यमिक शाळेत आणि राहिलेले २.३४ विद्यार्थी महाविद्यालयामध्ये शिकत होते. एकूण विद्यार्थीपैकी ५४.१८ % मुले व ४५.८२ मुली होत्या. अनुसुचित जातीच्या विद्यार्थीचे प्रमाण सुमारे १६.२८ % व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाणा सुमारे २.५६ % होते. सन २००३-०४ मध्ये जिल्ह्यात संपूर्ण साक्षरता अभियान अंतर्गत साक्षरोत्तर १०५५ केंद्र कार्यरत होती, त्यामध्ये २३९०७८ वयस्कर लाभार्थी शिक्षणाचा लाभ घेत होते.

### ३.१७ सार्वजनिक आरोगय विषय सोयी व सेवा

शासकीय निमशासकीय स्थानिक स्वाराज्य संस्था व नागरी संस्था यांचे मार्फत जनतेस वैद्यकीय सेवा उपलबध करुन देण्यात येतात. त्यापैकी शासकीय, जिल्हा परिषद व महानगर पालिका नगरपरिषदा यांचे मार्फत उपलब्ध असलेल्या सोयींचा विचार केला असता असे दिसून येते की, सन २०१०-११ अखेर जिल्ह्यात १७ रुग्णालये २१ दवाखाने १५ प्रसूतीगृहे ७७ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यतर आहेत. या संस्थातील खाटांची सख्या १६८१ इतकी आहे सरमाणसी ३९९ डॉक्टर व वैद्य, ८३७ परिचारिका होत्या, खाटांची संख्या १७५५ होती. प्राप्त झालेलया अंतिम आकडेवारीनुसार २००९ मध्ये १२१४११ जन्म व ३३८८४ मृत्यू नोंदलेले आहेत.

**३.१८ जिल्हा उत्पन्न**

सोलापूर जिल्ह्याचे चालू किंमतीनुसार २००९-१० चे स्थुल उत्पन्न २६१२५७९ लाख रुपये आहे. राज्याच्या एकूण सरासरी स्थुल उत्पन्नपेक्षा जिल्हयाचे स्थुल उत्पन्नाचा वाटा २.९० टक्के आहे. जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अचूक अंदाज करण्यासाठी प्रदेशाला संचयीत करणारे उत्पन्न ही संकल्पना वापरणे योग्य असले तरी जिल्हास्तरावरील आर्थिक उलाढालींचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादित राहत नसल्याने संबंधित जिल्ह्याला बाहेरून प्राप्त होणारे व संबंधित जिल्ह्यातून बाहेर जाणाऱ्या उत्पन्नाचे मोजमाप रोखने शक्य नसल्याने सदर पध्दतीचा वापर करता येत नाही. त्यामुळे उत्पन्न स्त्रोत पध्दती या संकल्पनेचा अवलंब करुन जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार केलेले आहेत. जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यातकरीता लागणारी मुलभूत माहिती अजुनही समाधानकारकरित्या उपलब्ध नाही.

प्राथमिक क्षेत्राकरीता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. मात्र इतर क्षेत्राकरीता आकडेवारी उपलब्ध नाही. त्या क्षेत्राकरीता जिल्हावार अनुरुप असे निर्देशांक वापरून त्या आधारे राज्यस्तवरावरील उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव अनुरुप निर्देशांचा वापर तसेच पध्दतीमधील अंर्तभूत उणीवा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने हे अंदाज ढोबळ मानाने जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी आजमाविण्यातकरीता वापरावेत. या प्रकरणात घेतलेले उत्पन्नाचे अंदाज वापरतानावरील मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

**३.१९ उद्योग**

सोलापूर जिल्हा औद्योगिकदृष्टयाही विकसित होत आहे. जिल्ह्यात सोलापूर शहरानजीक (अक्कलकोट रोड, होटगी रोड) या औद्योगिक वसाहती आहेत, तसेच जिल्हयातील विविध तालुक्यांच्या ठिकाणीही औद्योगिक वसाहती आहेत.

उदा. चिंचोली, बार्शी, कुर्डुवाडी येथे औद्योगिक वसाहती आहेत.

पुर्वीच्या काळी येथील हातमाग कापड उद्योग प्रसिध्द होता. सध्या येथील यंत्रमाग कापड उद्योगही प्रसिध्द आहे. येथील चादरी व टर्किश टॉवेल्स भारतभर प्रसिध्द आहेत. काही यंत्रमागधारक याची परदेशी निर्यातही करतात. कापडी वॉल हँगिंग्ज हे देखील येथील वैशिष्ट आहे. काही कंपन्या आपल्या मालाची १०० टक्के निर्यातही करतात. सोलापूर शहर व आसपासच्या भागत विडी उद्योग अनेक कुटुंबांसाठी महत्वाचा उद्योग आणि उत्पन्न स्त्रोत देखील आहे. सुती कापड उद्योग व विडी उद्योग यांमध्ये प्रामुख्याने तेलुगू भाषिक विणकर समाजाचा मोठा वाटा आहे.

दूध डेअरी, कृषी प्रक्रिया उद्योग गोमय उत्पादने व साखर कारखाने या उद्योगांच्या माध्यमातून लोकमंगल उद्योग समुह हा जिल्ह्यात अनेकांच्या रोजगाराचे साधन बनत आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात बिर्ला सिमेंट कारखाना आहे. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत सुत गिरण्या आहेत. कॅम शॅफ्टस बनवणारा प्रिसिजन उद्योग जिल्ह्यातील प्रमुख उद्योग बनू पाहतो आहे. तसेच सोलापूर शहराजवळ किर्लोस्कर कंपनीचा शिवाजी वर्क्स लिमिटेड हा इंजिन ऑटो पार्टस बनवणारा कारखाना आहे. केम येथील हळदीपासुन बनवले जाणारे कुंकू प्रसिध्द असून पंढरपूर, सांगोला व मंगळवेढा या तालुक्यांतील विणलेल्या घोंगडया महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत.

सोलापूर शहर व जिल्ह्यात पुर्वी अनेक छोट्या मोठ्या सूत गिरण्या होत्या. हळूहळू यंत्रमाग वाढत गेले. गिरणगाव ही सोलापूरची ओळख पुसट होत असली तरीही यंत्रमाग, कुशल व कष्टाळू कामगार व मोजके हातमाग यांच्या माध्यमातून मनमोहक साड्या, जेकॉर्ड चादरी, टर्किश टॉवेल, पडदे व वॉल हँगिग्ज यांचे उत्पादन आजही सोलापूरात मोठ्या प्रमाणावर होत आहे.

**३.२० पर्यटन**

धार्मिक व आध्यात्मिक दृष्टीकोनातून सोलापूर जिल्हा महराष्ट्रात महत्वाचा ठरतो तो प्रामुख्याने दक्षिणेची काशी असलेल्या पंढरपूरमुळेच, आषढी व कार्तिक एकादशीला लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनाला येतात आणि हे संपुर्ण महाराष्ट्राचाच प्रमुख धार्मिक उत्सव आहे असे म्हणता येईल. महाभारत काळात भगवान श्रीकृष्णाने मुचकंद राजाला वर दिला, त्यानंतर भक्त पुंडलिकरुपी मुचकुंद राजाला श्रीकृष्णाने विठ्ठलाच्या रुपात विटेवर उभे राहून दर्शन दिले, अशी कथा सांगितली जाते. पंढरपूर येथे विठ्ठल व रुक्मिणीची मंदिरे वेगवेगळी आहेत. ही मंदिरे शिल्पकलेचा उत्तम नमुनाही मानले जाते. मराठी माणासाची संस्कृती अध्यात्म व जीवन समृध्द करणारे काव्य संत कवींनी रचले ते विठ्ठलप्रती असलेल्या भक्ती प्रेमातूनच, तसेच महाराष्ट्रात यादव काळापासून जी समाजिक व आध्यात्मिक क्रांती सुरु झाली तिचे प्रमुख केंद्र चंद्रभागेचे वाळवंटच होते. पंढरपूर हे सोलापूर कोल्हापूर मार्गावर असून सोलापूर पासुन ६७ किमी अंतरावर वसलेले आहे.

जिल्ह्यात मंगळवेढे येथे श्री दामाजीपंत मंदिर आहे. तसेच माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथे अर्धनारी नटेश्र्वराचे एक अद्वीतीय असे हेमांडपती स्थापत्य शैली मंदिर आहे. बाराव्या शतकात यादव काळात या मंदिराचा जीर्णोध्दार केला गेल्याचा उल्लेख आढळतो. दक्षिण सोलापूर तालुक्यात हत्तरसंग कुडल येथे भीमा सीना संगम झ ालेला आहे. या ठिकाणी झालेल्या पुरातत्वीय संशोधनामुळे हे आज जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे. येथे संगमावर अकराव्या शतकात बांधलेली (कोरलेली) हरिहरेश्वर व संगमेश्वरी ही अजिंठा वेरुळची लेणी वेरुळच्या

शिल्पकलेशी साम्य असलेली महादेव मंदिरे आहेत. या ठिकाणी उत्खननात जगातील एकमेव असे दुर्मिळ शिवलिंग सापडलेले आहे. या ४ फुटी शिवलिंगावर शिवाची ३५९ मुखे व अन्य मुर्ती कोरल्या आहेत. या मंदिराच्या बांधकामचे वैशिष्ट असे की, महाशिवरात्रीच्या दिवशी सुर्योदयाच्यावेळी अनेक दरवाजे ओलांडुन सुर्यकिरणे शिवलिंगावर पडतात.

भारतात विष्णूची मंदिरे अतिशय कमी ठिकाणी आहेत. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात आढळतात. या हेमाडपंती स्थापत्य शैली मंदिरामुळे बार्शीला भगवंताची बार्शी म्हणतात. एकादशीला पंढरपुरात विठोबाचे दर्शन घेणारा वारकरी द्वादशीला बार्शीच्या भगवंताचे दर्शन घेतल्याशिवाय आपल्या गावी परत जात नाही. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा रस्त्यावर भीमा नदीच्या तीरावर माचणूर येथे महादेवाचे पुरातन मंदिर आहे. अकलूज येथे नीरा नदीच्या काठी प्रेक्षणीय किल्ला असून करमाळा येथेही प्रसिध्द भुईकोट किल्ला व अष्टकोणी विहिर आहे. मध्ययुगीन काळात बहामनी राजवटीत सोलापूरात बांधला गेलेला भुईकोट किल्ला हे जिल्ह्याचे खास वैशिष्टय तर आहेच तसेच किल्ला बांधणी शास्त्राचा उत्कृष्ट नमुना असलेला हा किल्ला १४ व्या शतकात बांधला गेल्याचे इतिहसकार सांगतात.

१६८५-८६ या काळात औरंगजेब सुमारे वर्षभर या किल्यावर राहिला होता. येथेच त्याच्या टंकसाळीतून चांदीची नाणी निर्माण झाल्याचे पुरावे आढळतात, ही नाणी आजही कोलकत्ता येथील म्युझियममध्ये आढळतात. १७९५- ते १८१८ या काळात हा किल्ला मराठ्याच्या ताब्यात होता. दुसरा बाजीरावाचा पाडाव मे १८१८ मध्ये केला (इंग्रज आणि मराठे यांच्यातील शेवटची लढाई जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील आष्टी येथे १८१८ मध्ये झाली आणि मराठेशाहीचा अंत झाला.

जिल्ह्यातील माळढोक पक्षी अभयारण्य व धर्मवीर संभाजी उद्यान तलाव (कंबर तलाव) पक्षी अभयारण्य ही अभयारण्य प्रसिध्द आहेत. सोलापूर शहरातील कंबर तलावात (संभाजी तलाव) दुर्मीळ पक्षी येत असल्याचे येथील पक्षीतज्ञ बी. एम. कुलकर्णी यांनी अभ्यासले तसेच त्यांनी नान्नज येथे माळढोकही अभयारण्यही शोधून काढले. कंबर तलाव हे सोलापुरचे फुफ्फुस आहे. येथे ६५ प्राकरचे पाणपक्षी वास्तव्यास असून हिवाळ्यात येथे १४ जातीची रानबदके परदेशातून येतात. मध्य अशिया, सैबेरिया, चीन, युरोप येथून ही रानबदके येतात. ढोक, ढिबरा, कव्हेर जातीचे मासेही या तलावात मुबलकपणे आढळतात. सुप्रसिध्द पक्षी तज्ज्ञ कै. सलीम अली यांचे हे आवडते ठिकाण होते. याच तळयाच्या परिसरात १४ उपवनांसह स्मृतिवनही तयार करण्यात आले आहे.

आम्रवन, चंपकवन, गणेशवन इत्यादी उपवने सामातजिक वनीकरण खात्यामार्फत विकसित करण्यात आली आहेत. हे स्मृतिवन देशविदेशातील पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. १९७९-८० मध्ये नान्नज (उत्तर सोलापूर तालुका) येथे माळढोक पक्षी अभयारण्या जाहीर करण्यात आले आहे. तीन फुट उंच व २० ते २५ किलो वजनाचे माळढोक आज जगात फक्त काही ठिकाणीच आढळतात त्यात सोलापूर जिल्हयातील नान्नज येथे त्यातील सुमारे २५ माळढोक आढळतात. जिल्ह्यातील माढा, मोहोळ व करमाळा हे तीन तालुके या अभयारण्यांतर्गत येतात.

**३.२१ फलोत्पादन**

सोलापूर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे कोरडवाहु शेती मोठ्या प्रमाणात आहे. कोरडवाहु जमिनीमध्ये फळ बाग लागवड फायदेशीर ठरत असल्यामुळे दिवसेंदिवस फलोत्पादन क्षेत्रात वाढ होत आहे. जिल्ह्यात अंबा, बोर, सिताफळ, लिंबू , द्राक्ष, डांळिंब व इतर फळपिकांचे उत्पादन घेतले जाते. सोलापूर जिल्ह्यात एकुण फळे व भाजीपाला पिकांखालील क्षेत्र ४८९६१ होते, यांचे निव्वळ नसलेल्या क्षेत्राशी प्रमाण ४.८६ टक्के इतके होते. सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यात सर्वाधीक म्हणजे एकुण फळपिकां खालील क्षेत्राच्या १४.८४ टक्के क्षेत्र इतके आहे. तर सर्वात कमी फळपिंकाखलील क्षेत्र अक्कलकोट तालुक्यात आहे.

करमाळा, बार्शी, सांगोला, मंगळवेढा तालुक्यात जवळ जवळ सरासरी जिल्ह्यातील एकुण फळपिंकाच्या क्षेत्रापैकी फक्त १० टक्के क्षेत्र या तालुक्यांमध्ये आहे. सोलापूर जिल्ह्यात फळपिंकांखालील क्षेत्र २४४३९ हेक्टर म्हणजे जिल्ह्यातील एकुण फळपिकांखालील क्षेत्राच्या ८०.१७ टक्के क्षेत्र डाळींब, बोर व सिताफळ इत्यादी फळपिकांखालील आहे. त्या खालोखाल आंबा उत्पादन खालील क्षेत्र ३९०० हेक्टर म्हणजे १०.०२ टक्के इतके आहे. केळी उत्पादनाखली क्षेत्र आहे. हे प्रमाण जवळ जवळ २ टक्के इतके आहे.

**३.२२ मृदा**

सोलापूर जिल्ह्यातील मृदा मध्यम काळी ते भारी काळी जमीन असून ती पाण्याचा उततम निचरा होणारी जमिन आहे. या मातीचा खालचा थर अग्निजन्यखडकाचा मुरुम या प्रकारत मोडतो. या मातीमध्ये कॅलशियमचे प्रमाण अधिक आढळते. तर चुनखडीचे प्रमाण ३.५ टक्के ते १० टक्के पर्यंत आढळते. काही ठिकाणची मृदा किंचित तपकिरी व फिक्कट काळी जमीन आहे. नदीच्या खोऱ्यातील व नालाकठची जमीन वगळता सोलापूर जिल्ह्यातील इतर जमिनींची ओल टिकवून ठेवण्याची क्षमता कमी आहे. या जमिनी ओलिताखाली आणल्यामुळे

जमिनीत अन्नद्रव्याचा साठा भरपूर असल्यामुळे इतर पिकाच्या तुलनेत ऊस पिकाखालील क्षेत्रात व उत्पादनात वाढ झ ाली आहे.

**३.२३ जलसिंचन**

जिल्ह्यात १२ नद्या असून त्यांची लांबी ७६६ कि.मी. आहे. भिमा ही प्रमुख नदी करमाळा, मोहोळ, माढा, दक्षिण मंगळवेढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातून वाहते तिची जिल्हयातील एकूण लांबी २८९ कि.मी. आहे. भीमा नदीच्या उजवीकडील भागात निरा नदी माळशिरस तालुक्यातुन वाहते तिची लांबी ७५ कि.मी. व माण नदी मंगळवेढा व सांगोला तालुक्यातून वाहते तिची लांबी ७८ कि.मी. आहे, डाव्या भागात सिना करमाळा, मोहोळ, माढा, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातून १२८ कि.मी. भोगावती नदी बार्शी मोहोळ तालुक्यातून ३३ कि.मी., बोरी नदी अक्कलकोट तालुका ४१ कि.मी. हरणा नदी अक्कलकोट व दक्षिण सोलापूर २४ कि.मी. नागझरी नदी बार्शी तालुका ३३ कि.मी. सांगोला तालुका अपुका नदी २६ कि.मी. कोरडा नदी २२ कि.मी. बेलवण नदी १० कि.मी. रामघाट नदी ४१ कि.मी. वाहते या भीमा नदीच्या उपनद्या आहेत.

सन २०१२-१३ नुसार जिल्ह्यात भीमा व वीर धरण हे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यरत असून या बरोबर जिल्ह्यात ११ तालुक्यांमध्ये ३८ लघु सिंचन प्रकल्प व ११५३ पाझर तलाव, ७२३ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पूर्ण झ ालेले आहेत. या सिंचन सोयीचा उपयोग ऊस लागतवडीस पोषक आहे.

कोष्टक क्र. ३.१: तालुकानिहाय पर्जन्य दिवसाची संख्या व एकुण पर्जन्य

पुढील कोष्टकामध्ये तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकुण पर्जन्य दाखविले आहे. सन २०१२-१३ मध्ये सोलापूर जिल्हयामध्ये एकुण पर्जन्य दिवसांची संख्या १५३ दिवस होती, तर पर्जन्य ५६१.४७ मि.मी. इतके होते. अक्कलकोट तालुक्यात सर्वात जास्त ६७६ मि.मी. इतका पावसाची नोंद झाली. त्याखालोखाल उत्तर व दक्षिण सोलापूर मध्ये ६१७.३ मि.मी. नोंद झाली, तर सर्वात कमी पावसाची नोंद सांगोला तालुक्यात ४६२ मि.मी. झाली.

सोलापूर जिल्ह्याचा विचार करता, सोलापूर जिल्हा हा मान्सून पावसावर पूर्णपणे अवलंबून आहे. पावसाळी ऋतुमध्ये मोठ्याप्रमाणात जमीन लागवडी खाली येते मात्र इतर ऋतुत त्याचे प्रमाण कमी होते. सद्यस्थितीत विहीरी, बंधारे, तलाव, कालवा यावर जलसिंचन अवलंबून आहे.

**कोष्टक क्र. ३.१ जलसिंचन**

| जलसिंचनाचे स्त्रोत | १९७०-७१ | १९८०-८१ | २०००-०१ |
|---|---|---|---|
| मोकळे जलसिंचन | २८.२ | २३.५ | २४.१ |
| भूजल जलसिंचन | ७५.८ | ४६.५ | ७५.९ |
| संपूर्ण जलसिंचन क्षेत्र | ०९ | १३.१ | २५.७ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण - २०००-०१

वरील कोष्टक एकूण लागवडी खालील क्षेत्रफळापैकी जलसिंचीत क्षेत्रफळ दर्शवितो. मात्र हे क्षेत्रफळ कमी असलेले पहावयास मिळते.

## ३.२४ पर्जन्यमान

**कोष्टक क्र. ३.२ तालुका निहाय पर्जन्य दिवसाची संख्या व एकूण पर्जन्य**

| सोलापूर जिल्हा | | | | संदर्भ वर्ष : २०१२-२०१३ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (पर्जन्य मी. मी.) | | | | | | |
| अ. क्र. | तालुका | सरासरी | | वर्ष : २०१२-२०१३ मधील | | |
| | | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य | सारासरीच्या तुलनेत वर्षातील पर्जन्याची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | करमाळा | १५३ | ५१४ | २० | २५९.६ | ४७.९९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | माढा | १५३ | ५३४.४ | ३१ | ४३६.३ | ८१.६४ |
| ३ | बार्शी | १५३ | ५९६.५ | ३३ | ४७४.८ | ७६.९२ |
| ४ | उत्तर सोलापूर | १५३ | ६१७.३ | ३३ | ४७४.८ | ७६.९२ |
| ५ | मोहोळ | १५३ | ५७३.९ | २६ | ३१६.८ | ५५.२० |
| ६ | पंढरपूर | १५३ | ५७३.९ | २३ | ३६०.७ | ६२.८७ |
| ७ | माळशिरस | १५३ | ४६३.४ | २६ | ३६३.६ | ७८.४६ |
| ८ | सांगोला | १५३ | ४६२.६ | २८ | ३९३.६ | ८५.०८ |
| ९ | मंगळवेढा | १५३ | ५१९.८ | ३० | ३८२.७ | ७३.६२ |
| १० | दक्षिण सोलापूर | १५३ | ६१७.३ | ३३ | ४७४.८ | ७६.९२ |
| ११ | अक्कलकोट | १५३ | ६७६.३ | ३५ | ५५६.३ | ८२.२६ |
| एकुण | | १५३ | ५६१.४७ | २८.९१ | ४१५.५३ | ७४.०१ |

स्त्रोत - जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय

खालील कोष्टकामध्ये सोलापूर जिल्हयातील कृत्रिम रेतन कार्यक्रमाची प्रगती दाखविली आहे. त्यामध्ये गायी व म्हशीचा तपशील दाखविला आहे. २०१०-११ साली संकरीत गायीची संख्या ६४८४१ एवढी तर २०१२-१३ मध्ये ७६६० एवढी होती. विदेशी गायीची संख्या २०१०- ११ ला ११९९९ तर २०१२-१३ ला १८५८३ होती तर देशी गायीची संख्या २०१०-११ ला २८०८९ तर २०१२-१३ ला ३३५८१ होती. यामध्ये २०११-१२ च्या तुलनेत २०१२-१३ मधील शेकडा बदल सर्वात जास्त विदेशी गायीचा २९.१६ होता, एकुण गायीचे कृत्रिम रेतन २३.९ टक्के होते. जन्मलेल्या वारसांची संख्या ४०.१९ टक्के होती.

**कोष्टक क्र. ३.३ : कृत्रिम रेतन कार्यक्रमाची प्रगती**

| सोलापूर जिल्हा |
|---|

| तपशील | २०१० - २०११ | २०११ - २०१२ | २०१२ - २०१३ | २०११ -१२ च्या तुलनेत २०१२ -१३ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| अ) गायी (कृत्रिम रेतन ) | | | | |
| १) संकरीत गायी | ६४८४१ | ६२९७१ | ७६६०३ | २१.६५ |
| २) विदेशी | ११९९९ | १४३८८ | १८५८३ | २९.१६ |
| ३) देशी | २८०८९ | २७२२५६ | ३३५८१ | २३.२१ |
| एकुण कृत्रिम रेतन | १०४९२९ | १०४६१५ | १२८७६७ | २३.०९ |
| जन्मलेल्या वारसांची संख्या (गायी) | ३७७६० | ३७५३१ | ५२६१६ | ४०.१९ |
| ब) म्हशी (कृत्रिम रेतन) | ३५८४६ | ३८६८६ | ३८७३७ | ०.१३ |
| जन्मलेल्या रेडकांची संख्या (म्हशी) | ११६८८ | १२०८४ | १३८७९ | १४.८५ |

स्त्रोत - जिल्हा पशु संवर्धन आधिकारी यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**कृत्रिम रेतन व दुध उत्पादनाची तालुकानिहाय स्थिती**

कृत्रिम रेतनाचे वार्षिक लक्ष २०१०-११ ला १८०८७५ एवढे ठरविले होते तर कृत्रिम रेतनाच्या सध्याची टक्केवारी ७७.८२ झाली. २०१२-१३ ला कृत्रिम रेतनाचे वार्षिक लक्ष १९५७५० ठरविली होती. तर सध्या ७९.२२ झ ाले. सर्वात जास्त सांगोला तालुक्यात २०१०-११ ला कृत्रिम रेतनाचे वार्षिक लक्ष्य २१८८० होते, तर २०१२-१३ ला माळशिरस तालुक्यात ३२०८६ एवढे वाढ झाली.

**३.२५ जिल्हयातील उद्योगाबाबत तपशील**

सोलापूर जिल्हयातील तालुकानिहाय उद्योगांबाबतचा तपशील दर्शविला आहे. सन २०१२-१३ मध्ये सोलापूर जिल्हयामध्ये १८१०.३७ कोटीची गुंतवणुक आहे. ही गुंतवणुक एकुण ११४८९ प्रकल्पांमध्ये आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्राची संख्या एकुण जिल्हयामध्ये ५ आहे. त्यामध्ये माढयात २, उत्तर सोलापूरात १, मोहोळमध्ये १ व मंगळवेढयात १ आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्रातील उद्योग घटकांची

संख्या एकुण ७०१  आहे. त्यामध्ये सर्वांत जास्त उत्तर सोलापूरात ५१७ तर मोहोळमध्ये १६७, माढयामध्ये १३ तर मंगळवेढयामध्ये ४ आहेत. सहकारी औद्योगिक विकास मंडळाच्या क्षेत्राची संख्या जिल्हयामध्ये एकूण ११ आहे.

### ३.२६ भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचे महत्त्व

जरी भारताच्या दरडोई उत्पन्नात शेतीचा वाटा कमी होत असला तरी सुध्दा शेती आणि शेतीशी संबंधित क्षेत्रे जसे की वनक्षेत्र, मासेमारी यांचा वाटा भारतीय दरडोई उत्पन्नाच्या जवळजवळ १४% आहे, तसेच निर्यातीच्या ११ टक्के आहे. एकूण लोकसंख्येपैकी निम्म्या लोकसंख्येला शेती हेच उपजिवीकेचे साधन आहे. याशिवाय उद्योगधंद्यांना कच्च्या मालाचा पुरवठा देखील या क्षेत्रामधूनच होतो.

कित्येक वर्षे भारताच्या आर्थिक वृध्दीमध्ये व विकासामध्ये शेतीचे महत्वाचे योगदान आहे. १९५०-५१ या वर्षात एकूण राष्ट्रीय मिळकतीत शेतीचा वाटा ५१.८१% होता. त्यानंतरच्या पंचवार्षिक योजनांच्या काळात ती हळूहळू कमी होत २०१३-१४ मध्ये १८.२०% पर्यंत खाली आला आहे. खालील तक्ता १ व आलेख क्र. १ मध्ये १९५०-५१ पासून एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा कसा कमी झाला हे दर्शविले आहे.

**कोष्टक क्र. ३.४ राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा**

| वर्ष | राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा |
|---|---|
| १९५०-५१ | ५१.८१ |
| १९६०-६१ | ४२.५६ |
| १९७०-७१ | ४१.९५ |
| १९८०-८१ | ३५.३९ |

| | |
|---|---|
| १९९०-९१ | २९.०२ |
| २०००-०१ | २३.०२ |
| २०१०-११ | १८.२१ |
| २०११-१२ | १७.८६ |
| २०१२-१३ | १७.५२ |
| २०१३-१४ | १८.२० |

स्त्रोत - केंद्रीय सांख्यिकी अहवाल २०१४




एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कमी होत गेलेला हा शेतीचा वाटा, त्याप्रमाणात असणाऱ्या रोजगाराशी किंवा त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येशी जुळताना दिसत नाही. आजसुध्दा जवळजवळ एकूण रोजगाराच्या ५२% लोक म्हणजे भारताची निम्मी लोकसंख्या या शेतीवर अवलंबून आपला उदरनिर्वाह करते आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा वाढला पाहिजे पण दुसऱ्या देशांशी तुलना करता शेतीपासून मिळणारे राष्ट्रीय उत्पन्न हे कमी आहे. शेती फक्त पुरूषांनाच रोजगार उपलब्ध करून देते असे नाही. तर स्त्रियांनासुध्दा रोजगार उपलब्ध करून देते. शेतीमधील प्रत्येक कामामध्ये स्त्रियांचा सहभाग हा लक्षणीय आहे. अगदी बियाणांच्या निवडीचे कार्य असो की, बियाणांची लागवड, खुरपणी, कोळपणी, मळणी, पेरणी, कापणी या सर्वच शेतीकामांमध्ये स्त्रियांचा सहभाग दिसून येतो.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या (NSSO) १९९९-२०००, २००४-०५ आणि २०११-१२ च्या साधारणपणे भारताच्या सर्वसाधारण रोजगाराच्या वृध्दीला २००४-०५ पासून खिळ बसलेली आहे. साधारणपणे मनुष्यबळात २००४-०५ नंतर फक्त २० लाखांची वाढ झालेली आहे. जी १९९९-२००० ते २००४-०५ च्या दरम्यान प्रतिवर्षी १२० लाखांच्या जवळ पास होती. शेतीशी निगडीत नसलेल्या रोजगारांची संख्या २००४-०५ च्या काळात प्रतिवर्षी ६०

लाख एवढी होती. तेथून शेती व्यवसायात संलग्न मनुष्यबळ संख्या कमी होण्यास सुरूवात झाली. जी आजतागायत कायम आहे.

भारतीय शेती ही जरी पारंपारिक असली तरी सुध्दा परदेशी व्यापारामध्ये या शेतीचे योगदान अमुल्य आहे. भारतातील शेती उत्पादनांना कित्येक वेळा आशियायी देशांतील शेती उत्पादनाशी तीव्र स्वरूपाची स्पर्धा करावी लागते. जागतिकीकरणामुळे आणि पुरक धोरणांमुळे ही स्पर्धा येत्या काळात वाढतच जाणार आहे. आपण शेती क्षेत्रामध्ये नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी शेतीचा विकास तसेच त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

शेती उत्पादनांची जगात निर्यात करणाऱ्या आघाडीच्या १५ देशांमध्ये भारताचा समावेश होतो. काही विशेष शेतीउत्पादने जसे की, कापूस, तांदूळ, मांस, तेल, मसाले, आणि साखर यांच्या निर्यातीमध्ये एक महत्वाचा निर्यातदार देश म्हणून भारत उदयास येत आहे. अशी शेतीमधील काही कृषि उत्पादने निर्यातीमध्ये स्पर्धा निर्माण करीत आहेत. विशेष करून बासमती तांदूळ आणि एरंडीतेल म्हणजे जागतिक व्यापार संघटनेच्या आकडेवारीनुसार आयात निर्यातीमध्ये शेतीक्षेत्राचा वाटा सन २०१३ मध्ये अनुक्रमे १.३१% आणि २.६९% एवढा राहिला आहे.

**कोष्टक क्र. ३.५ मध्ये भारतातील एकूण निर्यातीमध्ये कृषि क्षेत्राचा वाटा दर्शविला आहे.**

| वर्ष | एकूण निर्यात रू. लाखात | कृषि उत्पादनांची निर्यात रू. लाखात | कृषि उत्पादनांच्या निर्यातीची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९९१-९२ | १७८६५.४ | ३२०३ | १७.९० |
| १९९२-९३ | १८५३७.२ | ३११६ | १६.९० |
| १९९३-९४ | २२२३८.३ | ४०२८ | १८.१० |
| १९९४-९५ | २६३३०.५ | ४२२६ | १६.१० |
| १९९५-९६ | ३१७९४.९ | ६०८२ | १९.१० |
| १९९६-९७ | ३३४६९.७ | ६८६३ | २०.५० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९९७-९८ | ३५००६.४ | ६६२६ | १८.९० |
| १९९८-९९ | ३३२१८.७ | ६०३५ | १८.२० |
| १९९९-२००० | ३६८२२.४ | ५६०८ | १५.२० |
| २०००-०१ | ४४५६०.३ | ५९७३ | १३.४० |
| २००१-०२ | ४३८२६.७ | ५९०१ | १३.५० |
| २००२-०३ | ५२७१९.४ | ६७१० | १२.७० |
| २००३-०४ | ६३८४२.६ | ७५३३ | ११.८० |
| २००४-०५ | ८६५३५.९ | ८४७५ | १०.१० |
| २००५-०६ | १०२०९०.५ | १०२१४ | ९.९० |
| २००६-०७ | १२६३६१.५ | १२६८४ | १०.०० |
| २००७-०८ | १५९००६.७ | १९३९१ | १२.२० |
| २००८-०९ | १७३८६५.३ | १७७७५ | १०.२० |
| २००९-१० | १८४७७० | १९५७२ | १०.६० |

स्त्रोत - व्यापार व विनिमय खाते वार्षिक अहवाल २०१३-१४

कोष्टक क्र. ३.५ मध्ये निर्यातीमध्ये कृषि क्षेत्राचा हिस्सा दर्शविला आहे. सन १९९१-९२ मध्ये कृषि उत्पादनांच्या एकणू निर्यातीची टक्केवारी १७.९०% होती. त्यामध्ये १९९६-९७ मध्ये ३.००% नी वाढ झालेली आहे. त्यानंतर निर्यातीमध्ये सतत वाढ होऊन २००५-०६ मध्ये ९.९०% झाली. सन २००७-०८ त्यामध्ये २.३०% नी वाढ झाली. २००८-०९ मध्ये ती १०.२०% पर्यंत घसरली व सन २००९-१० मध्ये ०.४०% नी निर्यातीत पुन्हा वाढ झाल्याचे आढळले.

वरील आकृतीमध्ये भारतातील एकूण निर्यात तसेच निर्यातीमधील कृषिक्षेत्राचा वाटा याबाबत १९९१-९२ ते २००९-१० पर्यंतची माहिती दर्शविली आहे. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये प्रत्येक वर्षी वाढ होत असून ती १९९१-९२ मध्ये १७८६५.४० लाख रू. होती व सन २००९-१० मध्ये ती १८४७.७० लाख रूपयांवर गेली. तसेच या आकृतीमध्ये एकूण कृषि उत्पादनांची निर्यात दर्शविली आहे.

## ३.२७ कृषि कर्जाचे स्त्रोत

### ३.२६.१ संस्थात्मक स्त्रोत

भारतीय शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या कर्जाची गरज असते, यामध्ये १२ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या अल्प कर्जाची गरज असते. शेतीत कायमच्या सुधारणा करण्यासाठी ५ ते २० वर्षाच्या दीर्घ मुदतीची कर्ज घेतली जातात. भारतामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या काळात संस्थात्मक मार्गाने शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले गेले यामध्ये चांगले यश प्राप्त झाले आहे.

खालील ९ स्त्रोतांद्वारे संस्थात्मक कर्जपुरवठा होतो.

१. सहकारी बॅंका

२. व्यापारी बँक

३. भूविकास बँका

४. अग्रणी बँका

५. विभागीय ग्रामीण बँका

६. स्टेट बँक ऑफ इंडिया

७. भारतीय रिझर्व्ह बँक

८. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

९. सरकार

### ३.२७.१.१ सहकारी बँका

सहकारी पतपुरवठा हा सर्वात स्वस्त असा ग्रामीण कर्जपुरवठ्याचा मार्ग आहे. सहकारी बँकांची स्थापना ही शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्यासाठी झाली आहे. ग्रामीण सहकारी पतपुरवठा संरचना ही दोन भागांमध्ये विभागली आहे. एक अल्पमुदत आणि मध्यम मुदत कर्जाचा पुरवठा करते तर दुसरी दीर्घ मुदत कर्जाचा पुरवठा करते. भारतीय सहकारी बँकाची रचना त्रिस्तरीय असून ती पिरॅमिडच्या आकाराची आहे. १९५१ मध्ये सहकारी संस्थांच्या एकूण शेती क्षेत्रातील शेतीपुरवठ्यातील हिस्सा ३.००% एवढा होता. आता ५० वर्षानंतर सहकारी बँकांचा एकूण शेती पतपुरवठ्यातील हिस्सा ६०.००% पेक्षा अधिक झाला आहे.

### ३.२७.१.२ प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था

ग्रामीण भागात शेतकऱ्यांना अल्पमुदतीचा कर्ज पुरवठा करण्यासाठी प्राथमिक शेती पुरवठा संस्था स्थापना करण्यात आल्या. खेड्यातील १० पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येऊन अशा सहकारी संस्था स्थापन करू शकतात. प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्थांची सुरूवात १९०४ पासून झाली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्या संस्थांचा विकास वेगात झाला आहे. सरकारने प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांची पुनर्रचना केली. त्यामुळे त्यांची संख्या काही प्रमाणात घटली. रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांचे दुसऱ्या संस्थेत विलीनीकरणाच्या धोरणाने त्यांची संख्या घटली आहे. यामागे या संस्था सक्षम व्हाव्या हा हेतू आहे. १९७० पासून व्यापारी बँकांनी प्राथमिक सहकारी संस्थांच्या सहाय्याने ग्रामीण भागात कर्जवाटप करण्याचे धोरण स्वीकारले. राजस्थान, ओरिसा, मध्यप्रदेश, केरळ, गुजरात व तामिळनाडू या राज्यात प्राथमिक पतपुरवठा संस्थांना चांगले यश मिळाले आहे.

### ३.२७.१.३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

या बँका म्हणजे जिल्हा पातळीवरील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचा संघ होय. राज्य सहकारी बँका व प्राथमिक सहकारी संस्था यांना जोडणारा दुवा म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय. या बँका जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांना भांडवल पुरवितात. त्यांच्या कामकाजावर देखरेख ठेवतात. स्थावर मालमत्ता, शेती उत्पादन, सोने, चांदी इत्यादी उत्पादनावर कर्ज पुरवठा केला जातो. रिजर्व्ह बँक चालू काळात नाबार्डकडून देशातील कमकुवत मध्यवर्ती सहकारी बँकांचे पुनर्गठन करीत आहे. नाबार्ड राज्य सरकारांना स्वस्तदराने अर्थसहाय्य करीत आहे. त्यांच्या

सहाय्याने राज्य सरकारांनी मध्यवर्ती सहकारी बँकांचे भागभांडवल खरेदी करून त्यांची ताकद वाढवावी अशी अपेक्षा आहे.

### ३.२७.१.४ राज्य सहकारी बँक

राज्य पातळीवर राज्य सहकारी बँकांची स्थापना झाली आहे. राज्यातील सर्व मध्यवर्ती सहकारी बँक व इतर संस्थांना त्यांच्या कार्यात विविध प्रकारची मदत करण्याच्या हेतूने राज्य सहकारी बँकेची स्थापना झाली. ही सहकारातील शिखर संस्था आहे. रिझर्व्ह बँकेशी संपर्क साधण्याचे माध्यम म्हणून ही बँक ओळखली जाते. ही बँक रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊन ती मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून प्राथमिक पतपुरवठा संस्थांना कर्ज उपलब्ध करून देते.

### ३.२७.१.४.१ राज्य सहकारी बँकेची उद्दिष्टे

१. राज्य सहकारी बँकेचा मुख्य उद्देश सभासद संस्थांच्या कर्जाची गरज भागविणे हा आहे.

२. कृषि पतसंस्थांना उत्पादन कार्यासाठी, व्यापारी संस्थांसाठी, औद्योगिक संस्थांसाठी कर्जपुरवठा करणे.

३. ग्रामीण भागामध्ये बँक सुविधांचा विस्तार व विकास करणे.

४. सभासद संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवणे तसेच नियंत्रण ठेऊन मार्गदर्शन करणे.

५. सभासदांना इतर बँक सुविधा पुरविणे.

६. बँकेच्या भांडवलाचा काटकसरीने वापर करणे तसेच सभासदांकडून तसेच इतरांकडून ठेवी गोळा करणे.

### ३.२७.१.५ व्यापारी बँका

व्यापारी बँकांनी स्थापनेपासून शेती व्यवसायाला कर्जपुरवठा करण्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे सन १९६९ मध्ये १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले व १९८० मध्ये ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. याचा परिणाम म्हणून व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शाखा उघडून कर्जपुरवठा केला. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांनी कृषि पतपुरवठ्यात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. राष्ट्रीयीकरणाच्या पूर्वीच्या

काळात व्यापारी बँकांनी मोठ्या शेतकऱ्यांवर लक्ष केंद्रीत केले. परंतु राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांनी दुग्धव्यवसाय आदींसाठी कर्जपुरवठा देण्यास चालू केले आहे.

व्यापारी बँका अप्रत्यक्ष वित्तपुरवठ्याचा मार्ग स्वीकारतात याचाच अर्थ व्यापारी बँकांनी सहकारी संस्थांना वित्तपुरवठा करायचा व त्यांनी तो प्राथमिक सहकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना द्यावयाचा. खते व इतर शेती अदाने यांना अप्रत्यक्ष कर्जपुरवठा करण्यात व्यापारी बँकांचा सहभाग महत्वाचा आहे. अलिकडील काळात व्यापारी बँकांनी मध्यवर्ती भूविकास बँकांचे कर्जरोखे विकत घेण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे भूविकास बँक शेतकऱ्यांना मध्यम व दीर्घमुदतीचे कर्ज देण्याचे कार्य विस्तारीत करतील.

**३.२७.१.६ अग्रणी बँक योजना**

राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात अधिक शाखा उघडाव्यात व इतर सेवांचा विस्तार व्हावा यासाठी राष्ट्रीय पतमंडळाने डी.आर. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास गटाची नेमणूक करण्यात आली. त्यांनी व्यापारी बँकांना कर्ज देताना क्षेत्रीय दृष्टीकोनाचा विचार करावा अशी शिफारस केली, त्यानुसार सन १९६९ च्या अखेरीस अग्रणी बँक योजना जाहीर केली. देशातील ३८० जिल्ह्यांना ही योजना लागू केली जिल्ह्याच्या विकास कार्यात पुढाकार घेणे हे या बँकेचे कार्य असते. अग्रणी बँक योजनांद्वारे केल्या जाणाऱ्या पतपुरवठ्यात गुणात्मक सुधारणा करण्यासाठी १९८९ मध्ये व्यापारी बँकांनी सेवा प्रादेशिक दृष्टीकोनाचा स्वीकार केला.

**३.२७.१.७ विभागीय ग्रामीण बँका**

शेतकऱ्यांना व लघुउद्योगांना सुलभ कर्ज उपलब्ध व्हावे या हेतूने २ ऑक्टोंबर १९७५ मध्ये पाच जिल्ह्यात विभागीय क्षेत्रीय बँका सुरू करण्यात आल्या या बँकांचे क्षेत्र मर्यादित असते. त्यांना विभागासाठीच कार्य करावे लागते आधुनिक शेती पध्दतीमध्ये ग्रामीण पतपुरवठ्याची मागणी सातत्याने वाढत असून शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते.

### ३.२७.१.८ विभागीय ग्रामीण बँकांचे उद्देश

१. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणे.

२. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना कर्जपुरवठा करणे.

३. शेतकऱ्यांचे सावकारांवर अवलंबून राहणे कमी करणे.

४. गोर गरीबांना कर्जपुरवठा करून त्यांची उदर निर्वाहाची गरज भागविणे.

### ३.२७.१.९ विभागीय ग्रामीण बँकांची कार्ये

१. ग्रामीण भागातील लोकांच्या चालू व बचत ठेवी स्वीकारणे.

२. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अग्रक्रमाने अर्थसहाय्य करणे.

३. सहकारी संस्थांना कर्ज मंजूर करणे.

४. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

५. शासनाने वितरीत केलेल्या वेगवेगळ्या योजना ग्रामीण भागामध्ये राबविणे.

## ३.२८ सरकार मार्फत कर्ज

पूर्वीच्या काळी शेतकऱ्यांना जास्त व्याजदराने कर्ज घ्यावी लागू नये म्हणून सरकारद्वारे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली होती, त्यांना तकावी कर्जे म्हणतात. १९८३ च्या भुसुधारणा कायद्यानुसार शेतकऱ्यांना बंधारे बांधणे, कुंपण घालणे यासारख्या कामांना कर्जे दिली. दुष्काळ, भुकंप, महापूर अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात सरकारकडून कर्जपुरवठा केला जातो, यावरील व्याजदर कमी असतो. लहान हप्त्याने परतफेड करण्याची सोय असते. परंतु ही कर्जे शेतकऱ्यांमध्ये फारशी लोकप्रिय झाली नाहीत.

कर्ज मिळविण्यासाठी अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. दप्तर दिरंगाईने शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नाही. नोकरांची काम न करण्याची प्रवृत्ती, अकार्यक्षमता व लाचलुचपत या कारणांमुळे शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध झाले नाही. ही कर्जे जमिनीच्या तारणावर दिली जात असल्यामुळे खंडाने जमिनी घेतलेल्या

शेतकऱ्यांना ती मिळाली नाहीत अशी कर्ज मोठ्या शेतकऱ्यांनाच जास्त प्रमाणात मिळाली. एकूण कर्जपुरवठ्यातील सरकारचे कर्जपुरवठा करण्याचे प्रमाण अगदी नगण्य आहे.

### ३.२८.१ भारतीय स्टेट बँक

इम्पीरीयल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून तिचे स्टेट बँकेत रूपांतर केल्यानंतर शेतीक्षेत्राला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पतपुरवठा करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावली. या बँकेच्या शाख ग्रामीण व अर्धनागरी क्षेत्रात आहेत. शेती लागडी योग्य बनविण्यापासून ते पेरणीपर्यंत मळणी, साठवण, वाहतूक इ. कारणांसाठी स्टेट बँक वित्तपुरवठा करते. या बँकेने केलेल्या एकूण कर्जपुरवठ्यापैकी ७०% शेतकरी लहान व श्रीमंत आहे. १९७१ मध्ये स्टेट बँक व तिच्या संलग्न बँकांनी खेडी दत्तक योजना सुरू केली. दत्तक घेतलेल्या खेड्यातील शेतकरी, कारागीर, स्वयंरोजगार व्यक्तींना कर्जपुरवठा केला जातो.

या बँकेने देशाच्या सर्व भागात शाखा स्थापन केल्या आहेत. याशिवाय ही बँक लहान शेतकरी, सहकारी संस्थांना कर्जपुरवठा, भूविकास बँकांना मदत, विक्री प्रक्रिया संस्थांना अर्थपुरवठा, साठा गृहाच्या विकासासाठी पतपुरवठा, अग्रणी बँक योजना व ग्रामीण बँक निर्मितीत पुढाकार घेते. राज्य व मध्यवर्ती सहकारी बँकांचे भाग रोखे खरेदी करून त्यांना ही बँक भांडवल उपलब्ध करुन देते. अशा रीतीने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गाने स्टेट बँक समूह सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करते.

### ३.२९ भारतीय रिझर्व्ह बँक

दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील अनेक मध्यवर्ती बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्याचा परिणाम भारतावर देखील झाला. १ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करून ही बँक भारत सरकारची बँक म्हणून कार्य करू लागली. भारतामध्ये बहुसंख्य लोक शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. या शेती क्षेत्राचा विकास झ ाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारताचा विकास होणार नाही, हे लक्षात घेऊन रिझर्व्ह बँकेने एक स्वतंत्र पतपुरवठा विभाग स्थापन केला या विभागामार्फत शेतीला केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्याचा सखोल अभ्यास केला जातो.

रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती नेमली, या समितीने भारतातील शेती क्षेत्राच्या कर्जपुरवठ्याचा सखोल अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. या अहवालातील

शिफारशीनुसार रिझर्व्ह बँकेने शेतीकर्ज निधी निर्माण केला. या निधीतून शेती क्षेत्राला अल्प, मध्यम व दीर्घकालीन स्वरूपाचा कर्जपुरवठा केला जातो.

रिझर्व्ह बँक प्रत्यक्ष शेती क्षेत्राला कर्जपुरवठा करत नसते. ती वेगवेगळ्या बँकांमार्फत कर्जपुरवठा करण्याचे कार्य करते. रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेऊन विभागीय ग्रामीण बँका स्थापन केल्या व बँकामार्फत शेती क्षेत्राबरोबर शेती व्यवस्थापनाला पूरक असणाऱ्या धंद्यांना कर्जपुरवठा करण्याचे धोरण निश्चित झाले. १९८२ मध्ये ग्रामीण भागाच्या व शेती क्षेत्राच्या विकासासाठी रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेऊन राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना केली. सध्या नाबार्ड ही शेती क्षेत्राला पतपुरवठा करणारी बँक म्हणून कार्यरत आहे.

### ३.३० सन २०११-१२ मधील तालुकानिहा व्यापारी बँका

कोष्टक क्र. ३.१४ मध्ये तालुकानिहाय गावांची संख्या दर्शविली असून समोर तालुकानिहाय सन २०११-१२ मधील बँकांची संख्या दर्शविली आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ११४४ खेडी असून व्यापारी बँका असलेल्या खेड्यांची संख्या २०७ आहे व एकूण बँक शाखांची संख्या ४६५ आहे.

## कोष्टक क्र. ३.६ तालुका निहाय व्यापारी बँका

| तालुके | एकूण गावे | व्यापारी बँका असलेली एकूण गावे | एकूण टक्केवारी | एकूण बँक शाखा | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| करमाळा | १२२ | १२ | ५.८०% | २६ | ५.५९% |
| माढा | ११६ | १५ | ७.२५% | ४२ | ९.०३% |
| बार्शी | १३७ | २१ | १०.१४% | ५१ | १०.९७% |
| दक्षिण सोलापूर | ४० | ७३ | ३५.२७% | ९६ | २०.६५% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मोहोळ | १०१ | ११ | ५.३१% | ३५ | ७.५३% |
| पंढरपूर | १०० | १६ | ७.७३% | ४१ | ८.८२% |
| माळशिरस | ११७ | १८ | ८.७०% | ६१ | १३.१२% |
| सांगोला | १०२ | १२ | ५.८०% | ३७ | ७.९६% |
| मंगळवेढा | ८१ | ८ | ३.६% | २४ | ५.१६% |
| उत्तर सोलापूर | ९१ | ६ | २.९०% | २२ | ४.७३% |
| अक्कलकोट | १३७ | १५ | ७.२५% | ३० | ६.४५% |
| एकूण | ११४४ | २०७ | १००.००% | ४६५ | १००.००% |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सांख्यिकी माहिती - २०११-१२

कोष्टक क्र. ३.१५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बँका सुविधांची सन १९६०-६१ पासून २०१२-१३ पर्यंतची प्रगती दर्शविली आहे. सन १९६०-६१ मध्ये जिल्ह्यातील बँकांची संख्या फक्त ४४ होती ती सन २०१२-१३ मध्ये ४८९ वर गेली.

सोलापूर जिल्ह्यातील सन १९६०-६१ ते २०१२-१३ पर्यंतच्या एकूण बँका

### ३.३१ नदी प्रणाली

नदी ही देशाचीची नव्हे तर संपूर्ण जगाची रक्तवाहिनी आहे. वनस्पती वाढीसाठी तसेच मातीसाठी आवश्यक असणारी खनिज मूलतत्वे व पोषक तत्वे यांचे योग्य वितरण करण्याचे काम नद्या करतात. नदी फक्त मानवाच्या वापरासाठी पाणी पुरवण्याचे काम करत नाही, तर उद्योगधंद्यांना पाणी पुरवणे, वाहतूक, दळणवळणासाठी महत्वाचे साधन आहे. पूर्वपरंपरागत मानवी जीवनात नद्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. ग्रामीण भागात नद्या पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी पुरवण्याचे काम करतात.

सोलापूर जिल्ह्यात भिमा ही मुख्य नदी असून ती जिल्ह्याच्या मध्य भागातून वाहते. भिमा नदी ही कृष्णा नदीची प्रमुख उपनदी असून तिचा उगम सह्याद्री पर्वत रांगेतील भिमाशंकर येथे झाला असून हे ठिकाण पुणे

जिल्ह्यामध्ये येते.  भिमा नदीच्या अनेक उपनद्या आहेत त्यापैकी निरा, माण, सिना, वोरी या उपनद्यांचा सोलापूर जिल्ह्यात समावेश होतो.

माण नदी ही सातारा जिल्ह्यातील महादेव डोंगररांगेचा भाग असणाऱ्या फलटण डोंगररांगेत उगम पावते त्यानंतर ती दहीवडीच्या पूर्वेला वाहत जाऊन म्हसवड, सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, तालुक्यातून पुढे भिमेच्या उजव्या किनाऱ्याला जावून मिळते.  माण नदीची एकूण लांबी १६० कि.मी. असून त्यापैकी फक्त ८० कि.मी. लांबी सोलापूर जिल्ह्याअंतर्गत येते.

सीना ही महत्वाची नदी असून ती सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय दिशेने वाहते.  या नदीचा उगम तोरणा या ठिकाणी झाला.  सोलापूर जिल्ह्यात लांबी १८० कि.मी. आहे.  कुडल या ठिकाणी ती भीमा नदीला मिळते.

निरा ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून तीचा उगम पुणे जिल्ह्यात भोरे येथे होतो.  संगम या ठिकाणी निरा भिमा नदीला मिळते.

भोगावती ही नदी सिनेची उपनदी असून बार्शी तालुक्यात रामलिंग टेकड्यात उगम पावते.  लांबी ६४ कि.मी. .आहे. ती भोईरे येथे सिनेला मिळते.

**३.३२ भूमी उपयोजन -**

सोलापूर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १४८९५ चौ.कि.मी. असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी सोलापूर जिल्ह्याचा वाटा ४.८८% इतका आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या भूमी उपयोजनाबद्दल उपलब्ध सांख्यिकीय आकडेवारी फक्त जिल्ह्याच्या कृषी व्यवसायात किंवा लागवडीत किती वाढ झाली,  एवढेच दाखवत नाही तर जिल्ह्यामध्ये किती क्षेत्रफळ लागवडीखाली आणण्याची क्षमता आहे हे ही दाखविते.

सोलापूर जिल्ह्यातील भूमीउपयोजन नैसर्गिक भूपृष्ठाविषयी माहिती देते.  सोलापूर जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी फक्त २.१४ टक्के क्षेत्रफळ वनाखाली येते.  महाराष्ट्र राज्य आणि भारतदेशाशी तुलना करता भारतातील वनाखालील क्षेत्रफळ २०.२ टक्के आहे.  त्यापैकी ६.८ टक्के क्षेत्रफळ उच्च दर्जाच्या वनाखाली असून १३.४ टक्के वनक्षेत्र हे विखुरीत दर्जाच्या वनाखाली असलेले आढळते.  पर्यावरणीय दृष्ट्या वनक्षेत्र एकूण क्षेत्रफळाच्या ३३ टक्के असणे आवश्यक आहे.

सोलापूर जिल्ह्यात त्यामानाने खूपच कमी क्षेत्रफळ वनाखाली आहे. त्यामागे कारण हेही आहे की, सोलापूर जिल्हा हा पर्जन्य छायेच्या तसेच दुष्काळग्रस्त प्रदेशात येतो.

सोलापूर जिल्ह्याचे एकूण वनक्षेत्र २.१४ टक्के असून जिल्ह्यातील पाच तालुके सरासरी पेक्षा कमी वनक्षेत्राखाली असून सहा तालुके सरासरीपेक्षा जास्त वन क्षेत्राखाली आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील निव्वळ पडीक जमीन ४.७६ टक्के असून सोलापूर जिल्ह्यातील ७ तालुक्यांचे निव्वळ पडीक जमिनीखालील क्षेत्रफळ सरासरीपेक्षा कमी आहे. तर उरलेल्या चार तालुक्यात सरासरी पेक्षा खूपच जास्त क्षेत्रफळ निव्वळ पडीक जमिनीखाली आहे. ते अनुक्रमे बार्शी, सांगोला, माळशिरस आणि माढा हे तालुके असून त्याचे कारण असे की, भौगोलिक दृष्ट्या या तिन्ही तालुक्यात डोंगराळ भागांचा जास्त समावेश होतो. पडिक जमिनीखाली सोलापूर जिल्ह्यातील २२.१६ क्षेत्रफळ असून, निव्वळ लागवडी खालील क्षेत्रफळ सुमारे ६५.६० टक्के इतके आहे.

**कोष्टक क्र. ३.७ सोलापूर जिल्ह्याचे तालुक्यानुसार भूमी उपयोजन**

(२००० - ०१)

| अ. क्र. | तालुक्याचे नावे | वनाखालील क्षेत्रफळ | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | निव्वळ पडीक जमीन | पडीक जमीन क्षेत्रफळ | निव्वळ लागवडीखालील क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | उत्तर सोलापूर | २.५२ | ५.७३ | २.१८ | २९.७७ | ५९.८० |
| २. | बार्शी | १.७० | ७.४९ | ६.८८ | २८.९६ | ५५.०२ |
| ३. | अक्कलकोट | ०.४५ | ०.२१ | ३.३४ | २६.२७ | ६९.७३ |
| ४. | दक्षिण सोलापूर | १.०३ | ३.७९ | १.७९ | २३.९२ | ६९.४७ |
| ५. | मोहोळ | १.५२ | १२.२० | ०.२२ | १६.७३ | ६९.३५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | मंगळवेढा | ०.६४ | ३.४२ | ३.५८ | १८.७७ | ७३.५९ |
| ७. | पंढरपूर | २.३८ | ५.४५ | ३.३८ | १५.४८ | ७४.३१ |
| ८. | सांगोला | ४.४६ | ९.१९ | ११.२० | २३.४७ | ५१.५१ |
| ९. | माळशिरस | ३.१७ | ३.४३ | १२.७३ | २०.५५ | ६०.१२ |
| १०. | करमाळा | ३.७८ | ५.०० | ३.४९ | २०.०४ | ६७.६९ |
| ११. | माढा | १.२२ | २.८९ | ४.६७ | १९.८६ | ७१.३३ |
| | एकूण | २.१४ | ५.३४ | ४.७६ | २२.१६ | ६५.६० |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण - २०००-०१

**३.३३ हवामान -**

एखाद्या प्रदेशाचे हवामान म्हणजे त्या प्रदेशाचे वर्षानुवर्षे असणारे तापमान, पर्जन्यमान, हवेचा दाब तसेच वाऱ्याचा वेग व दिशा हे होय. भौतिक पर्यावरणाचा हवामान हा महत्वाचा घटक असून त्याचा मानवाच्या आर्थिक कार्यावर जसे कि कृषि व्यवसाय यावर खोलवर परिणाम होतो.

तापमान पर्जन्यमान, हवेचा दाब, वारे, सूर्यप्रकाश, आर्द्रता या सर्व घटकांचा पिकांच्या वाढीवर, पिक पध्दतीवर आणि पिक उत्पादकतेवर परिणाम होतो. कृषि व्यवसायाच्या मुख्य गरजा जसे की, पाणी, मनुष्यबळ, माती ह्या आहेत परंतु हे घटक बऱ्याचशा प्रमाणात हवामान प्रकारावर अवलंबून असतात.

हवामान दृष्ट्या विचार करता सोलापूर जिल्हा पूर्णपणे कमी पर्जन्य छायेच्या प्रदेशात येतो. या प्रदेशात मुख्यत्वे करून उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे तीन प्रमुख ऋतू आहेत. उन्हाळा ऋतूचा कालावधी मार्च ते जूनच्या मध्यापर्यंत असतो. जास्त तापमान, कमी आर्द्रता, धूळीची वादळे, गरम हवा ही उन्हाळी ऋतुची मुख्य वैशिष्ट्ये आहेत.

पावसाळा ऋतुचा कालावधी जून ते ऑक्टोंबर आहे.  जास्त तापमान, जास्त आर्द्रता, अभ्राच्छादित आकाश, पावसाच्या अचानक कोळसणाऱ्या सरी ही या ऋतुची वैशिष्ट्ये आहेत.  पावसाची सुरूवात ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे होते.

हिवाळा ऋतुचा कालावधी ऑक्टोबर ते मार्च असून या ऋतुची वैशिष्ट्ये म्हणजे निरभ्र आकाश, आल्हाददायक वातावरण, कमी तापमान ही होय.

**३.३४ तापमान  -**

तापमान हा हवामानाचा सर्वात महत्वाचा घटक असून कृषि व्यवसायावर या घटकाचा खूप परिणाम होतो. प्राकृतिक रचनेनुसार प्रत्येक प्रदेशातील तापमानात फरक जाणवतो तसेच त्यावर अक्षवृत्तीय विस्ताराचा देखील परिणाम होत असतो.  सोलापूर जिल्ह्याचे कमाल तापमाण ४६° सें. असून त्याची नोंद उन्हाळ्यामध्ये होते तर किमान तापमान ९° सें. असून त्याची नोंद हिवाळ्यात होते.

**३.३५ पाऊस  -**

सोलापूर जिल्ह्यातील कृषि व्यवसाय पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे.  उजनी धरण सोडल्यास या जिल्ह्यात एकही जलसिंचन प्रकल्प नाही.

तसेच सोलापूर जिल्हा हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो.  पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे.  सोलापूर जिल्ह्यात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणावरून जिल्ह्याचे तीन विभागात विभाजन करता येते.  पहिला विभाग म्हणजे पूर्वीय विभाग यात बार्शी, उत्तर व दक्षिण सोलापूर, अक्कलकोट या तालुक्यांचा समावेश होतो.

मध्यविभागात मोहोळ, मंगळवेढा, पंढरपूर तालुक्याचा पूर्वीय भाग व माढा तालुक्यांचा समावेश होतो.

पश्चिम विभागामध्ये करमाळा, सांगोला, माळशिरस तसेच माढा तालुक्याचा समावेश होतो.

**कोष्टक क्र. ३.८ तालुकानिहाय लोकसंख्या**

| अ. क्र. | तालुका | एकूण लोकसंख्या | लोकसंख्या घनता | पुरूष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या | लिंगगुणोत्तर (दर हजारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अक्कलकोट | ३१४५७० | २२६ | १६१३१४ | १५३२५६ | ९५० |
| २. | बार्शी | ३७२७११ | २५१ | १९३७७७ | १७८९३४ | ९२३ |
| ३. | करमाळा | २५४४८९ | २५१ | १३२७७७ | १२१७८९ | ९१८ |
| ४. | माढा | ३२४०२७ | २१० | १६९४३० | १५४९५७ | ९१२ |
| ५. | माळशिरस | ४८५६४५ | ३१९ | २५१५२८ | २३४११७ | ९३१ |
| ६. | मंगळवेढा | २०५९३२ | १८१ | १०७१५४ | ९८७७८ | ९२२ |
| ७. | मोहोळ | २७६९२० | १९७ | १४४२९९ | १३२६२१ | ९१९ |
| ८. | पंढरपूर | ४४२३६८ | ३३९ | २३०३५९ | २१२००९ | ९२० |
| ९. | दक्षिण सोलापूर | १०५७३५२ | १४१७ | ५३६३३१ | ५२१०२१ | ९७१ |
| १०. | सांगोला | ३२२८४५ | २०८ | १६७६५४ | १५६०९१ | ९३६ |
| ११. | उत्तर सोलापूर | २६०८९७ | २१८ | १३४२०६ | १२६६९१ | ९४४ |
| | एकूण | ४३१७७५६ | २९० | २२२७८५२ | २०८९९०४ | ९३८ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण - २०११-१२

जिल्ह्यात पुरुषांचे प्रमाण अधिक असून ते सुमारे ५१.५९% आहे. तर स्त्रियांचे प्रमाण ४८.४१% आहे.

### ३.३६ लिंग गुणोत्तर -

खाली नमुद तक्ता जिल्ह्यातील स्त्री-पुरूष प्रमाण दर्शविते.

**कोष्टक क्र. ३.९ लिंग गुणोत्तर**

| अ. क्र. | तालुका | लिंग गुणोत्तर (दर हजारी) | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | ग्रामीण | नागरी |
| १. | बार्शी | ९४१ | ९२५ | ९४६ |
| २. | अक्कलकोट | ९४२ | ९४५ | ९३६ |
| ३. | करमाळा | ९४८ | ९४१ | ९७१ |
| ४. | माढा | ९२९ | ९२९ | ९५० |
| ५. | उत्तर सोलापूर | ९२७ | ९२७ | ९४५ |
| ६. | मंगळवेढा | ९१५ | ९१५ | ९१९ |
| ७. | मोहोळ | ९२७ | ९२१ | ९४५ |
| ८. | सांगोला | ९४४ | ९४५ | ९३२ |
| ९. | दक्षिण सोलापूर | ९२४ | ९२३ | ९२८ |
| १०. | माळशिरस | ९३३ | ९३४ | ९२६ |
| ११. | पंढरपूर | ९२५ | ९२२ | ९४० |
| | एकूण | ९३४ | ९३० | ९४५ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २०१०

सन २००१ नुसार लिंगगुणोत्तर ९३४ असून, सर्वात जास्त करमाळ्याचे तालुक्याचे आहे तर सर्वात कमी मंगळवेढा तालुका दर्शवितो. ग्रामीण भागात लिंग गुणोत्तर ९३० असून नागरी भागात ९४५ इतके आहे.

**३.३७ मागासलेली जाती व जमाती यांचे प्रमाण -**

जिल्ह्यात मागासलेल्या जातीचे प्रमाण १५.०४% आहे. मागासलेल्या जमातीचे प्रमाण १.७९% असून त्यांचे प्रमाण उत्तर सोलापूर मध्ये जास्त असून मंगळवेढ्यात कमी आहे.

**३.३८ कृषि व्यवसाय -**

जिल्ह्यातील सुमारे ७०% लोक शेतीवर अवलंबून असून, उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्च्या मालाचा पुरवठा हा शेतीतून होत असतो. सोलापूर जिल्ह्यात लागवडीखाली असणारे क्षेत्रफळ कमी आहे. तसेच शेती ही दुष्काळग्रस्त भागात असून एकूण क्षेत्रफळ १०४८.५९ हजार हेक्टर असून त्यापैकी ओलीताखाली असणारे क्षेत्रफळ १००६.४७ हजार हेक्टर आहे.

**३.३९ तालुका निहाय लोकसंख्या वाढ -**

कोष्टक क्र. ३.१० सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या वाढ दर्शवितो ही वाढ सन १९६१ मधील लोकसंख्या सन २००१ मधील लोकसंख्येच्या ५०% आहे. तालुका निहाय लोकसंख्या वाढीत विविधता असून सर्वात जास्त लोकसंख्या वाढ बार्शी तालुक्यात असून सर्वात कमी लोकसंख्या पंढरपूर तालुक्यात आहे.

संपूर्ण जिल्ह्याचे लोकसंख्या वाढीनुसार तीन विभागात वर्गीकरण करता येईल हे खालीलप्रमाणे

१. उच्च लोकसंख्या वाढ

२. मध्यम लोकसंख्या वाढ

३. कमी लोकसंख्या वाढ

वरील वर्गीकरण हे जिल्ह्याच्या सरासरीवर अवलंबून आहे.

**कोष्टक क्र. ३.१० तालुका निहाय लोकसंख्या वाढ**

| अ. क्र. | तालुका | लोकसंख्या | | लोकसंख्या वाढ (%) १९६१-२००१ |
|---|---|---|---|---|
| | | १९६१ | २००१ | |
| १. | बार्शी | २२०१५ | ३४०८३१ | १८३.१९ |
| २. | अक्कलकोट | १७५३३३ | २९००३७ | १५२.८५ |
| ३. | करमाळा | १२८३४५ | २३३३१६ | १२२.२७ |
| ४. | माढा | १५६५११ | २९२६११ | ११४.९९ |
| ५. | उत्तर सोलापूर | १२२५०४ | २१०७७४ | ११४.४८ |
| ६. | मंगळवेढा | ८९१७२ | १७१२६१ | १०८.६२ |
| ७. | मोहोळ | १२३०७८ | २५२५२६ | ९५.०८ |
| ८. | सांगोला | १२८०१२ | २७२०७७ | ८८.८६ |
| ९. | दक्षिण सोलापूर | ४०५८३३ | ९६०८०३ | ७३.१२ |
| १०. | माळशिरस | १६६५२१ | ४२२६०० | ६५.०३ |
| ११. | पंढरपूर | १५३९१५ | ४०२७१७ | ६१.८६ |
| | एकूण | १८६०११९ | ३८४९५४३ | ९३.५० |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २०१०

**३.४० ग्रामीण - नागरी लोकसंख्या वाढ -**

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात नागरीकरणाचे प्रमाण ४२.३९% असून त्यामानाने सोलापूर जिल्ह्यात त्याचे प्रमाण कमी आहे ते जवळ जवळ ३१.८२% इतके आहे.

खाली दर्शविलेला तक्ता नागरी ग्रामीण लोकसंख्या दर्शवितो. त्यावरून त्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाचा वेग लक्षात येईल.

औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे त्या प्रदेशातील लोकसंख्येचे स्थलांतर मोठ्या प्रमाणत होते व त्यामुळे नागरी भागात लोकसंख्या वाढ होते.

## कोष्टक क्र. ३.११ तालुका निहाय नागरी व ग्रामीण लोकसंख्या

| अ. क्र. | तालुका | लोकसंख्या | | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | नागरी | |
| १. | बार्शी | २६६०४६ | १०४७८५ | ३४०८३१ |
| २. | अक्कलकोट | २२७९२२ | ६२११५ | २९००३७ |
| ३. | करमाळा | २११३८८ | २१९२८ | २३३३१६ |
| ४. | माढा | २६९८३४ | २२७७७ | २९२६११ |
| ५. | उत्तर सोलापूर | २१०७७४ | ० | २१०७७४ |
| ६. | मंगळवेढा | १४९५५५ | २१७०६ | १७१२६१ |
| ७. | मोहोळ | २५२५२६ | ० | २५२५२६ |
| ८. | सांगोला | २४३९६१ | २८११६ | २७२०७७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | दक्षिण सोलापूर | ८८३२५ | ८७२४७८ | ९६०८०३ |
| १०. | माळशिरस | ४२२६०० | ० | ४२२६०० |
| ११. | पंढरपूर | ११३२८ | ९१३७९ | ४०२७१७ |
| | एकूण | २६२४२५९ | १२२५२८४ | ३८४९५४३ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण ३ २०१०

**कोष्टक क्र. ३.१२ रस्त्यांचे प्रकार व लांबी**

| अ. नं. | रस्त्यांचे प्रकार | लांबी किमी |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग | १७७ |
| २ | राज्य महामार्ग | १५७२ |
| ३ | मुख्य जिल्हा मार्ग | ३०११ |
| ४ | इतर जिल्हा मार्ग | ४१०१ |
| ५ | खेडे अंतर्गत मार्ग | ६०५४ |
| ६ | रेल्वे मार्ग | ३७५.४ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २०१२

**कोष्टक क्र. ३.१३ बँक कार्यालये**

| वर्ष | राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा |
|---|---|
| १९६०-६१ | ४४ |
| १९७०-७१ | ९६ |
| १९८०-८१ | २४४ |
| १९९०-९१ | ३९९ |
| २०००-०१ | ४४० |
| २००७-०८ | ६८८ |
| २००८-०९ | ४३९ |
| २००९-१० | ४५० |
| २०१०-११ | ४५० |
| २०११-१२ | ४६५ |
| २०१२-१३ | ४८९ |

स्त्रोत - सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २०१२

**३.४१ पिक पध्दती -**

ठराविक कालावधीत विशिष्ठ पिकांचे असणारे प्रमाण म्हणजे पिक पध्दती होय.

कृषी व्यवसायात होणारा विकास व बदलती पिक पध्दती यांचे जवळचे नाते आहे. तसेच पिक पध्दती व कृषी कर्ज यांचे जवळचे नाते आहे.

**कोष्टक क्र. ३.१४ पिक पध्दती**

| अ. क्र. | पिक | क्षेत्रफळ | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २००० | सन २००५ | सन २०१० |
| १. | तूरदाळ | ३२३०० | १८९०० | ४१८०० |
| २. | बाजरी | ५३३०० | १४८०० | १८४०० |
| ३. | कापूस | ६५०० | ८०० | १८०० |
| ४. | डाळ | ३०७०० | ४३.९०० | ५६४०० |
| ५. | भुईमूग | २१८०० | ११७०० | ३४०० |
| ६. | ज्वारी | ६३८८०० | ६३४५६६ | ६४१६०० |
| ७. | जवस | ११०० | ४०० | ४०० |
| ८. | मका | १३९०० | ३८५६२ | ५५९०० |
| ९. | मूग | ५१०० | २८०० | २९०० |
| १०. | कारळे | ३०० | १०० | १०० |
| ११. | तांदूळ | ३००० | १०० | ७०० |
| १२. | सूर्यफूल | १८९०० | १२५०० | ७४०० |
| १३. | तीळ | १०० | ४०० | ४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | सोयाबीन | ६०० | ११०० | ४३०० |
| १५. | ऊस | ६४७०० | ६८३०० | १६३१०० |
| १६. | सूर्यफूल | ४१००० | ३७५०० | २६७०० |
| १७. | उडीद | ४६०० | ४१०० | ८३०० |
| १८. | गहू | ५०९०० | ५८९०० | ८७८०० |

स्त्रोत - जिल्हा सांख्यिकी माहिती सोलापूर २०१२

**३.४२ उत्पादन प्रारूप**

हवामानानुसार पिक प्रारूप व उत्पादन प्रारूप बदलते.

**कोष्टक क्र. ३.१५ उत्पादन प्रारूप**

| अ. क्र. | पिक | उत्पादन (टन) | | |
|---|---|---|---|---|
| | | सन २००० | सन २००५ | सन २०१० |
| १. | तूरदाळ | १२५०० | ५९०० | १५६०० |
| २. | बाजरी | २२१०० | ६७०० | ९६०० |
| ३. | कापूस | ११२०० | १३०० | ५२०० |
| ४. | डाळ | १७३०० | ३३४०० | ३७५०० |
| ५. | भुईमूग | २०४०० | ११६०० | १८०० |
| ६. | ज्वारी | २८६८०० | ३२०३६६ | ३८०८०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | जवस | ३०० | १०० | १०० |
| ८. | मका | २६३०० | १०३५२२ | १२३५०० |
| ९. | मूग | ३०० | २१०० | २००० |
| १०. | कारळे | १०० | १०० | १०० |
| ११. | तांदूळ | ३४०० | १०० | २०० |
| १२. | सूर्यफूल | ६००० | ४८०० | ४७०० |
| १३. | तीळ | २०० | १०० | १२९ |
| १४. | सोयाबीन | १००० | ८०० | ५३०० |
| १५. | ऊस | ५९५२५०० | ५६६०५०० | १६०००१०० |
| १६. | सूर्यफूल | २४२०० | १९९०० | १३९०० |
| १७. | उडीद | २३०० | २७०० | ५२०० |
| १८. | गहू | ५६००० | ६९२०० | १२२९०० |

स्त्रोत - जिल्हा सांख्यिकी माहिती सोलापूर २०१२

### ३.४३ सारांश -

सोलापूर जिल्हा हा अवर्षण प्रवण भागात येतो.  सोलापूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १४८९५.११ चौ.कि.मी. आहे.  जिल्ह्याने महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ४.८८ टक्के क्षेत्रफळ व्यापले आहे.  सोलापूर जिल्ह्यामध्ये भिमा, निरा, सिना आणि माण या प्रमुख नद्या आहेत.  सोलापूर जिल्हा हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो त्यामुळे जिल्ह्यात पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे.  जिल्ह्यात पाऊस हा ईशान्य मोसमी वाऱ्याकडून येतो व सरासरी पाऊस ४५० मि.मी. एवढा पडतो.  सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ४३.१७ लाख एवढी आहे.  त्यापैकी पुरुष संख्या २२.२७ लाख तर स्त्रियांची संख्या २०.८९ लाख एवढी आहे.

सोलापूर जिल्ह्याची पिक पध्दती ही एक पिक पध्दती आहे.  जिल्ह्यामध्ये खरीप व रब्बी हंगामात पिके घेतली जातात.  जिल्ह्यात घेतली जाणारी मुख्य पिके म्हणजे ज्वारी, बाजरी, मका, गहू, ऊस आणि भूईमूग ही आहेत. जिल्ह्याचा काही भाग हा उजनी धरणाच्या लाभ क्षेत्राखाली येतो व काही भाग हा निरा कालव्याच्या लाभ क्षेत्राखाली येतो.  माढा, पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला आणि माळशिरस हे तालुके वगळता इतर तालुके मुख्यत: विहीरी आणि बोअरवेल यावर अवलंबून आहेत.

## ३.४४ संदर्भ साधने -


१. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २००८

२. सोलापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण २००९-१०

३. जिल्हा सांख्यिकी माहिती अहवाल २०११-१२

४. http://mr.wikipedia/wiki/सोलापूर जिल्हा

५. डॉ: संतोष दास्ताने , महाराष्ट्र , २०१५

६. https://mr.wikipedia.org/wiki/सोलापूर

७. भारतीय जनगणना अहवाल २०११

८. GEOGRAPHICAL INFORMATION

९. सोलापूर कृषी अधीक्षक कार्यालय २००७-०८

१०. सोलापूर जिल्हा सामाजिक आणि आर्थिक पाहणी अहवाल २००० -०१ आणि २०१०-११

११. सोलापूर जिल्हा परिषद, अहवाल २०११

१२. सोलापूर जिल्हा नियोजन अहवाल , २०१२

१४. http://ahd.maharashtra gov.in

१६. http://www.maharashtratourism.net/cities/solapur.html Maharashtra tourism